



# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com






* वर्ष ६५ वे * अंक ११९ * नांदेड * बुधवार, दि. ६ मे २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


# 'नैतिकदृष्ट्या टीएमसी जिंकली, मी राजीनामा देणार नाही'

## ममता बॅनर्जी यांचं पराभवानंतर वक्तव्य



**कोलकाता (प्रतिनिधी)–** पश्चिम बंगालच्या निवडणुकीत टीएमसीला मोठा धक्का बसला आहे. ममता बॅनर्जी यांचाही पराभव झाला आहे. दरम्यान, या सर्व घडामोडीनंतर ममता बॅनर्जी यांनी पत्रकार परिषद घेत भाजप आणि निवडणूक आयोगावर गंभीर आरोप केले आहेत. यावेळी पत्रकार परिषदेत बोलताना ममता बॅनर्जी यांनी एक मोठं वक्तव्य केलं आहे. 'नैतिकदृष्ट्या टीएमसी जिंकली आहे, तर मी राजीनामा का देऊ?', असं ममता बॅनर्जी यांनी म्हटलं आहे.

पुढे त्या म्हणाल्या की, मला अतिशय खेदाने हे सांगावं लागत आहे की लोकांचे घटनात्मक हक्क आणि ईव्हीएम लुटून निवडणूक आयोग या पश्चिम बंगालच्या निवडणुकीत खलनायक बनलं आहे. मला सांगा मतदानानंतर ईव्हीएम ८० ते ९० टक्के चार्ज कसे? हे जरा तुम्ही मला सांगू शकाल का? खरंच हे कसं शक्य आहे?, असा सवाल ममता बॅनर्जी यांनी केला आहे.

पश्चिम बंगालच्या निवडणुकीच्या दोन दिवस आधी त्यांनी आमच्या अनेक लोकांना अटक करायला सुरुवात केली. अनेक ठिकाणी त्यांनी छापे टाकले. एवढंच नाही तर अनेक आयपीएस आणि आयएएस अधिकाऱ्यांनाही बदललं, त्यांनी त्यांच्या मर्जीतील लोकांना त्या ठिकाणी नेमलं आणि भाजपाने थेट निवडणूक आयोगाशी संगनमत करून हा खेळ खेळला. असं ममता बॅनर्जी म्हणाल्या.

पंतप्रधान आणि केंद्रीय गृहमंत्री देखील यामध्ये सामील असून थेट हस्तक्षेप करत आहेत. त्यांनी एसआयआरच्या माध्यमातून तब्बल ९० लाख नावं वगळली आहेत. त्याविरोधात जेव्हा आम्ही न्यायालयात गेलो, तेव्हा ३२ लाख नावांचा त्यात समावेश करण्यात आला. त्यांनी घाणेरडं आणि नीच राजकारण केलं. मी माझ्या आयुष्यात अशा प्रकारची निवडणूक कधीही पाहिली नाही, असं ममता बॅनर्जी यांनी म्हटलं आहे.

## राज्य राखीव पोलीस बल गट क्रमांक ५ अंतर्गत घेण्यात आलेली भरती स्थगित

**मुंबई (प्रतिनिधी)–** एका खाजगी प्रकाशकाच्या प्रकाशन संस्थेतील सराव प्रश्नसंचातील तब्बल ८५ प्रश्न जसेच्या तसे उचलण्यात आल्याने राज्य राखीव पोलीस बल गट क्रमांक ५ ची भरती स्थगित करण्यात आली आहे.

महाराष्ट्र पोलीस भरती अंतर्गत एसआरपीएफ गट ५, दौंड लेखी परीक्षेत एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. एका खासगी प्रकाशनाने प्रसिद्ध केलेल्या पुस्तकातील १०० पैकी तब्बल ८५ प्रश्न जसेच्या तसे उचलण्यात आल्याचं प्रकरण समोर आल्याने अपर पोलीस महासंचालक यांनी पत्रक काढत भरती स्थगित करत असल्याची घोषणा केली. समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. ५, दौंड यांचे अधिपत्याखालील सन २०२४–२५ सशस्त्र पोलीस शिपाई भरतीसाठी लेखी परीक्षा दि. २ मे २०२६ रोजी आयोजित करण्यात आली होती.

# अतिक्रमण पथकासोबत वाद घालणाऱ्या जमावावर पोलिसांचा सौम्य लाठीचार्ज

## वादानंतर दोन जेसीबीने अतिक्रमण हटविले



**नांदेड (प्रतिनिधी)–** महापालिकेच्या अतिक्रमण पथकासोबत हुज्जत घालणाऱ्या जमावावर पोलिसांनी सौम्य लाठीचार्ज केला. या प्रकरणी काही जणांना ताब्यातही घेण्यात आले आहे.

शहरातील वाढते अतिक्रमण काढण्यासाठी महापालिकेने आता कंबर कसली आहे. शहर अतिक्रमणमुक्त करून वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी महापालिका प्रशासनाने धडक कारवाई करण्याची मोहीम हाती घेतली आहे. दोन दिवसांपासून वाघी रोडवरील अतिक्रमण काढून टाकले. मात्र अतिक्रमण हटाव पथकावर ४ मे रोजी जमावाने हल्ला केला. त्यात जेसीबी चालक गंभीर जखमी झाला. त्यामुळे महापालिका प्रशासन ॲक्शन मोडवर आले व ५ मे रोजी पोलिसांच्या मोठ्या फौजफाट्यासह २ जेसीबीच्या सहाय्याने तेथील अतिक्रमण जमिनदोस्त केले.

सध्या नांदेड शहर अतिक्रमणाच्या विळख्यात सापडले आहे. फुटपाथ तर व्यावसायिकांच्या मालकीची झाली असून रस्त्यावर टपऱ्या, फळगाडे व इतर व्यावसायिक दुकाने थाटण्यात आली आहेत. पोलीस प्रशासन अतिक्रमणावर कारवाई करते, परंतु परिस्थिती जैसे थे राहते. ४ मे रोजी मिलगेट परिसर तसेच वाघी रस्त्यावरील अतिक्रमण काढण्यासाठी बंदोबस्त लावण्यात आला होता.

दि. ५ मे रोजी महापालिका प्रशासनाने २ जेसीबीसह अतिक्रमण पथक व पोलीस फौजफाट्यासह वाघी रोडवरील अतिक्रमण काढण्यास सुरुवात केली. यावेळीही तेथे अतिक्रमण पथक व पोलिसांशी हुज्जत घालून शासकीय कामात अडथळा निर्माण केला. यावेळी पोलिसांनी प्रथम समजावण्याचा प्रयत्न केला, मात्र जमाव समजण्याच्या मनस्थितीत नसल्याने अखेर पोलिसांनी लाठीचार्ज केला. त्यामुळे जमाव पांगला यानंतर मनपा, पोलीस पोलीस व अग्निशमन दलाच्या पथकाने मुख्य रस्ता आणि फुटपाथवरील अतिक्रमण काढून टाकले. यावेळी महापालिकेचे उपायुक्त अजितपालसिंघ संधू, शहर वाहतूक शाखेचे सहायक पोलीस निरीक्षक भागवत नागरगोजे, वजिराबाद पोलीस ठाण्याचे अधिकारी, कर्मचारी यांनी मोहिमेमध्ये सहभागी झाले होते.

# जेसीबी चालकास मारहाण करणाऱ्या सात जणांविरुद्ध गुन्हा दाखल; तिघांना अटक

## मनपाच्या अतिक्रमण हटाव पथकावर हल्ला प्रकरण

**नांदेड (प्रतिनिधी)–** महापालिकेच्या अतिक्रमण विभागाकडून शहरात सर्वत्र अतिक्रमण हटाव मोहीम महापौर कविता मुळे आणि आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांनी घेतली आहे. या मोहिमेअंतर्गत सोमवार दि. ४ मे रोजी एनटीसी मिल परिसरात वाघी रस्त्यावर अतिक्रमण काढत असताना तेथील काही नागरिकांनी चक्क जेसीबी चालकावर जेसीबीवर चढून प्राणघातक हल्ला गेला. यात जेसीबी चालक गंभीर जखमी झाला आहे. याप्रकरणी वजिराबाद पोलीस ठाण्यात सात जणांविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी तिघांना अटक केली आहे.

शहरातील प्रमुख व अंतर्गत रस्ते, चौकासह शहरालगतच्या रस्त्यावरही मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झाले आहे. शहरातील वाहतुकीची कोंडी फोडण्यासाठी आणि रस्ते मोकळे करण्यासाठी महानगरपालिका आणि पोलीस विभाग यांच्यावतीने संयुक्तपणे मोठी अतिक्रमण विरोधी मोहीम राबविण्यात येत आहे. या कारवाईत श्रीनगर, वर्कशॉप, देगलूर नाका, शासकीय विश्रामगृह, छत्रपती चौक, काबरानगर, जुना मोंढा टॉवर ते जुना मोंढा ब्रीज दरम्यानच्या मुख्य रस्त्यावरील सर्व अतिक्रमणे हटवण्यात आली आहेत. याच मोहिमेतंर्गत महानगरपालिकेच्या अतिक्रमण निर्मुलन पथक एनटीसी मिल ते वाघी रस्त्यावर दोन्ही बाजूने झालेले अतिक्रमण काढण्यासाठी सोमवारी दुपारी गेले होते. यावेळी कारवाई करण्यास विरोध करून येथील लोकांनी या पथकावर जोरदार हल्ला चढविला होता. यात आतिक मोहम्मद खलील शेख, शेख आयान शेख हबीब, उमरखान सय्यद खान आणि त्यांच्या इतर चार साथीदारांनी संगणमत करून जेसीबी चालक बालू कांबळे यास कॅबिनमधून खेचून काढत जबर मारहाण केली होती. बराच वेळ ही मारहाण सुरू होती. यामुळे कांबळे गंभीर जखमी झाले होते. त्यास शासकीय रूग्णालयानंतर शहरातील एका खासगी रूग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. तर अन्य काही कर्मचारी सुद्धा यात जखमी झाले होते.

या हल्ल्यामुळे रस्त्यावर बराच वेळ गोंधळ उडाला होता, असे अतिक्रमण विभागाचे उपायुक्त अजितपालसिंघ संधू यांनी सांगीतले की असा प्रकार खपवून घेतल्या जाणार नाही. तर या घटनेमुळे महापालिकेच्या कर्मचाऱ्यांमध्ये संताप पसरला होता. मात्र या प्रकरणी बालू कांबळे यांच्या फिर्यादीवरून वजिराबाद पोलीस ठाण्यात वरील सात जणांविरुद्ध गुन्हा दाखल करून पोलिसांनी तिघांना अटक केली आहे.

## पुन्हा हल्ले सुरू; लेबनानमध्ये सात जणांचा मृत्यू

**लेबनान (वृत्तसंस्था)–** गेल्या काही काळापासून युद्धामुळे संपूर्ण जगाची झोप उडालेली आहे. अजूनही मध्यपूर्वेत तणावाचे वातावरण आहे. अशातच आता इस्रायलने दक्षिण लेबनानमध्ये भीषण हवाई हल्ले केले. या हल्ल्यांमध्ये किमान सात जणांचा मृत्यू झाला असून अनेक जण जखमी झाले आहेत. इस्रायलने दक्षिणेकडील नऊ गावांतील रहिवाशांना तेथून स्थलांतर करण्याचे आवाहन केले होते, त्यानंतर आता हा हल्ला केला आहे.

# राज्यात लैंगिक शोषणातील आरोपींना पॅरोल न मिळण्यासाठी सरकारच्या हालचाली

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यात आता लैंगिक शोषणातील आरोपींना पॅरोल न मिळण्यासाठी राज्य सरकारने हालचाली सुरू केल्या आहेत.

सध्या सगळ्या राज्यात नसरापूर घटनेमुळे नागरिकांमध्ये संतापाचा वातावरण आहे. पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यात नसरापूर आहे. या नसरापूरमध्ये एका साडेतीन वर्षांच्या बालिकेवर अत्याचार करून तिचा निर्घृण खून करण्यात आला. ही घटना शुक्रवारी १ मे रोजी उघडकीस आली. या घटनेनंतर खवळलेल्या ग्रामस्थांनी नसरापूरवरुन जाणाऱ्या पुणे–बंगळुरू महामार्गावरील वाहतूक रोखून धरली. मोठं आंदोलन केलं. शनिवारी मोर्चा काढून कडकडीत बंद पाळला. मंगळवारी राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत या नसरापूर घटनेवर चर्चा झाली. नसरापूर मधील घटनेच्या संदर्भात आजच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत चर्चा झाली. लैंगिक शोषणातील आरोपींना पॅरोल मिळू नये, यासाठी फडणवीस सरकार कायद्यात बदल करणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यासंदर्भात कॅबिनेट बैठकीत विधी व न्याय विभागाला निर्देश दिले आहेत.

# राज्यात एकीकडे उन्हाच्या झळा तर मराठवाडा अन् विदर्भात अवकाळीने गारवा

## शेतकऱ्यांची पिके धोक्यात

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यात उष्णतेमुळे नागरिक त्रस्त झाले असून ऊन्हापासून बचावासाठी वेगवेगळे पर्याय अवलंबत आहेत. तसेच, भरदुपारी घराबाहेर जाणेही टाळले जात आहे. एकीकडे कडक उन्हामुळे अंगाची लाहीलाही होत असताना दुसरीकडे मराठवाडा आणि विदर्भात अवकाळी पावसाने हजेरी लावली आहे.

काही जिल्ह्यात जोरदार वाऱ्यासह गारांचा पाऊस पडल्याचंही दिसून आलं. जालना, गोंदिया, भंडारा, गडचिरोली, नंदूरबार जिल्ह्यात अवकाळीमुळे वातावरणात गारवा निर्माण झाला आहे. तर, काही ठिकाणी शेतकऱ्यांच्या पिकांचं नुकसान झालं आहे.

जालना तालुक्यातील रामनगर परिसरात वादळी वाऱ्यासह पावसाने हजेरी लावल्याने उकाड्यापासून हैराण झालेल्या नागरिकांना काहीसा दिलासा मिळाला. जालना तालुक्यात आज अचानक काही भागात वादळी वाऱ्यासह पावसाने जोरदार हजेरी लावली. रामनगर कारखाना परिसरात दुपारी अचानक वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस बरसला. गेल्या काही दिवसांपासून जालना जिल्ह्यात तापमानाचा पारा वाढल्याने नागरिक उकाड्याने प्रचंड हैराण झाले होते. मात्र, या पावसाने परिसरातील हवेत गारवा निर्माण झाल्याने नागरिकांना उष्णतेपासून तात्पुरता दिलासा मिळाला.

## नांदेड परिक्षेत्रातील अवैध व्यवसाय विरोधी मोहीम

# चौथ्या दिवशी ७३ गुन्हे दाखल, ९९ जणांविरुद्ध कारवाई; ८२ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त



**नांदेड (प्रतिनिधी)–** परिक्षेत्रात अवैध व्यवसाय विरोधी मोहीम राबविण्यात येत आहे. मोहिमेच्या चौथ्या दिवशी पथकाने ७३ गुन्हे दाखल करून ९९ जणांविरुद्ध कारवाई केली एवढेच नाही तर ८२ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

सदर मोहिमेच्या चौथ्या दिवशी नांदेड परिक्षेत्रात, अवैध वाळू उपसा करणाऱ्या ४ जणांविरूद्ध गुन्हे दाखल करून ५४ लाख ३३ हजार ४९१ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.


त्याचप्रमाणे, दिवसभरात गुटखा विक्रीच्या २ कारवाया करून १५ हजार ३४० रुपये किंमतीचा गुटखा व इतर मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. मटका जुगार खेळणाऱ्या व खेळविणाऱ्या एकूण ४२ इसमांविरुद्ध महाराष्ट्र जुगार कायद्याअंतर्गत २३ गुन्हे दाखल करण्यात आले असून, त्यांच्याकडून ६ लाख ४१ हजार १३० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तर, अवैध दारू विक्री करणाऱ्या ४४ आरोपींविरुद्ध ४१ गुन्हे दाखल करून, त्यांच्याकडून २१ लाख ९ हजार ७८१ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. यासोबतच, शस्त्र अधिनियमान्वये २, कोटपा अन्वये २, तर इतर अधिनियमाखाली मिळून, एकूण ७३ कारवाया करण्यात आल्या असून, यात निष्पन्न झालेल्या आरोपीतांकडून ८२ लाख १४२ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. उपरोक्त कारवाईत नांदेड परिक्षेत्रातील नांदेड, परभणी, हिंगोली व लातूर येथील अधिकारी व अंमलदारांनी भाग घेतला.

# सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांची संख्या वाढवण्यास मंत्रिमंडळाची मंजुरी

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** भारताच्या सर्वोच्च न्यायालयात अनेक प्रकरणे प्रलंबित आहेत. यात दरवर्षी दाखल होणाऱ्या प्रकरणांमुळे अधिक भर पडते. एकदा एखादं प्रकरण न्यायालयात गेलं की त्याच्या निकालांपर्यंत अनेक वर्षांचा काळ जातो. त्यामुळे न्यायालयातील प्रलंबित प्रकरणांची संख्या वाढते. या पार्श्वभूमीवरच आता केंद्र सरकारने एक महत्वाचा निर्णय घेतला आहे.

मंगळवारी पंतप्रधान मोदी यांच्या अध्यक्षतेखाली केंद्रीय मंत्रिमंडळाची महत्वाची बैठक पार पडली आहे. या बैठकीत अनेक मोठे निर्णय घेण्यात आले आहेत. या निर्णयामध्येच सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांच्या संख्येत वाढ करण्याबाबत एका निर्णयाचा समावेश आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाने आता सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांची संख्या वाढवण्याच्या प्रस्तावाला मंजुरी दिली आहे. त्यामुळे आता सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांची एकूण संख्या ३३ वरून ३८ होणार आहे.

दरम्यान, केंद्रीय मंत्रिमंडळाने सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांची संख्या वाढवण्याच्या प्रस्तावाला मंजुरी दिली असली तरी या संख्येत भारताच्या सरन्यायाधीशांचा (सीजेआय) समावेश नाही. या बरोबरच हा महत्त्वपूर्ण बदल लागू करण्यासाठी आता केंद्र सरकार आगामी अधिवेशनात सर्वोच्च न्यायालय (न्यायाधीशांची संख्या) सुधारणा विधेयक २०२६ सादर करण्याची शक्यता आहे.




# चीनमध्ये फटाक्यांच्या कारखान्यात भीषण स्फोट; २१ ठार, ६१ जखमी

**बिजिंग (वृत्तसंस्था)–** मध्य चीनमधील एका प्रांतातील फटाक्यांच्या कारखान्यात भीषण स्फोट झाल्याची घटना उघडकीस आली आहे. या स्फोटात किमान २१ जणांचा मृत्यू झाला असून, ६१ जण जखमी झाले आहेत. स्फोट झाल्यानंतर घटनास्थळी लगेच बचाव पथक आणि अग्निशमन दलाचे जवान दाखल झाले व आगीवर नियंत्रण मिळवले.

घटनास्थळी जवळपास ५०० बचाव पथके तैनात करण्यात आली होती. स्फोट झाला त्या कारखाण्यात दोन काळ्या पावडरच्या गोदामांमुळे जास्त धोका असल्याचे उघडकीस आले. यानंतर बचाव पथकाने तात्काळ या ठिकाणी अडकून पडलेल्या कर्मचाऱ्यांनी आणि इतरांना सुखरुप बाहेर काढले. स्फोटाचे नेमके कारण अद्याप समोर आलेले नाही. पण, तपास अधिकारी स्फोटाच्या कारणाचा शोध घेत आहेत.

समोर आलेल्या अधिकच्या माहितीनुसार, कंपनी विरोधात प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात आल्या आहेत, पण उपाययोजनांचा तपशील समोर आलेला नाही. स्फोट झाल्यानंतर या घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर जोरदार व्हायरल झाला असून, धुराळे प्रचंड लोट हवेत जाताना दिसत आहेत. हाऊशेंग या फटाक्यांच्या कंपनीत हा स्फोट झाल्याचे वृत्त साऊथ चायना मॉर्निंग पोस्टने दिले आहे. या अपघाताची पंतप्रधान शी जिनपिंग यांनी गंभीर दखल घेतली असून, तपासाचे आदेश देण्यात आले आहेत.

## दहावी व बारावीच्या परीक्षा शुल्कात वाढ

**पुणे (प्रतिनिधी)–** जुलै–ऑगस्ट २०२६ मध्ये होणाऱ्या दहावी आणि बारावीच्या पुरवणी परीक्षांच्या शुल्कात वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. या संदर्भातील अधिकृत परिपत्रक राज्य मंडळाचे सचिव डॉ. दिपक माळी यांनी प्रसिद्ध केले असून, सुधारित शुल्काची अंमलबजावणी आगामी पुरवणी परीक्षेपासूनच केली जाणार आहे. शासकीय आदेश आणि मंडळाच्या कार्यकारी परिषदेच्या बैठकीतील निर्णयानुसार हे शुल्क सुधारित करण्यात आले आहे. या निर्णयामुळे आता पुनर्परीक्षार्थी, श्रेणीसुधार योजनेखालील विद्यार्थी आणि खाजगी विद्यार्थ्यांना वाढीव परीक्षा शुल्क भरावे लागणार आहे.

# शिवाजीनगर ठाण्यातून पळालेल्या चोरट्यांना पोलिसांनी केली अटक

## एका महिलेसह तिघांना न्यायालयीन कोठडी

**नांदेड (प्रतिनिधी)–** भाग्यनगर पोलीस आणि घरफोडेतील चोरट्यांना पकडल्यानंतर कारागृहातून शिवाजीनगर पोलिसांनी ताब्यात घेतले होते. त्यातील दोघेजण पोलिसांच्या हातावर तुरी देऊन दि. ४ मे रोजी पसार झाले होते, मात्र पोलिसांनी शिताफिने त्यांना अटक केली. मंगळवार, दि. ५ मे रोजी एका महिलेसह तिघांना न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने पुन्हा त्यांना न्यायालयीन कोठडीत पाठवले आहे.

शिवाजीनगर पोलिसांनी गुन्ह्याच्या तपासासाठी तीन आरोपींसह एका महिलेला हस्तांतरण वारंटवर ताब्यात घेतले होते. न्यायालयाची परवानगी मिळाल्यानंतर या आरोपींची गुन्हे शोध पथकाकडून चौकशी सुरू होती. हा प्रकार काल रात्रीचा आहे. दरम्यान, पोलिसांची नजर चुकवत दोन आरोपींनी खिडकीतून उड्या मारून पळ काढला होता.

पोलिसांनी तात्काळ धावपळ करत शोधमोहीम सुरू केली. पळून गेलेल्या आरोपींपैकी दोघांना पकडण्यात यश आले. आरोपी सोहेल अब्दुल सत्तार (रा. जवाहरनगर, नांदेड), अर्जुन पुरुषोत्तम मोरे (वय २८ राहणार नंदी गल्ली सोनखेड हल्ली मुक्काम चौफाळा), प्रदीपकुमार वीरेंद्रकुमार कौरी (वय २० राहणार धनेगाव बळीरामपूर) आशा हरिश्चंद्र तेलंग (वय ५६ रा. शाहूनगर) यांना शिवाजीनगर पोलिसांनी न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने सर्वांना न्यायालयीन कोठडीत पाठवले आहे. यातील सोहेल अब्दुल सत्तार आणि प्रदीपकुमार कौरी हे फरार झाले होते.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# शक्तिपीठ महामार्ग!

राज्यातील विविध महामार्गांच्या घोषणा होत आहेत आणि त्याची कार्यही काही ठिकाणी सुरू झाली आहे. परंतु असे महामार्ग करून शेतकऱ्यांचे नुकसान तर केले जात नाही ना, अशी शंका निर्माण झाली आहे. शक्तीपीठ महामार्गाचा प्रश्नही असाच आहे. सर्व शक्तीपीठांना महामार्गाद्वारा जोडल्यानंतर लोकांना दर्शनासाठी सुलभ होईल हे जरी खरे असले तरी त्यामुळे हजारो एकर सुपीक जमीन नष्ट होणार आहे. परिणामी कृषी उत्पादन कमी होईल व शेतकरी देशोधडीला लागतील असा आरोप शेतकऱ्यांच्यावतीने करण्यात येत आहे. जमिनीच्या बदल्यात पैसे जरी मिळणार असले तरी पैसे देऊन ही जमीन मिळणार नाही हे लक्षात घ्यायला कोणी तयार नाही. आपली प्रगती कितीही जरी झाली तरी कृषी उत्पादन हे कुठल्याही कारखान्यात होणार नाही हे ध्यानात ठेवणे गरजेचे आहे. त्यासाठी शेताची आणि शेतकऱ्यांची गरज आहे. सध्याचे राजकीय धोरण पाहता महामार्गांच्या या मालिकेत शेतकऱ्यांचे प्रश्न मात्र दुय्यम ठरताना दिसतात. जमीन संपादन, योग्य मोबदला, पुनर्वसन, पर्यावरणीय परिणाम यांसारख्या मुद्द्यांवर स्पष्ट धोरण दिसून येत नाही. अनेक वेळा शेतकऱ्यांना योग्य माहितीही दिली जात नाही, ज्यामुळे त्यांचा विरोध अधिक तीव्र होतो. विकास हा लोकांच्या सहभागातूनच साध्य होतो, हे प्रशासनाने लक्षात ठेवणे गरजेचे आहे. यापुढे सरकारने आधीच्या प्रकल्पांची वेळेत पूर्तता करणे, पारदर्शकता राखणे आणि स्थानिकांच्या हिताचे संरक्षण करणे यावर भर द्यायला हवा. मराठवाड्यातील व कोकणातील निसर्ग, शेती आणि स्थानिक संस्कृती यांचे संतुलन राखूनच विकासाचा मार्ग आखला गेला पाहिजे. अन्यथा, विकासाच्या नावाखाली निर्माण होणारी ही अस्वस्थता भविष्यात मोठ्या संघर्षाचे रूप घेऊ शकते. कोकणाच्या निसर्गसंपन्न भूमीत पुन्हा एकदा विकासाच्या नावाखाली अस्वस्थतेची सावली दाटू लागली आहे. नागपूररेड्डी शक्तिपीठ महामार्गाच्या नव्या घोषणेमुळे हजारो एकर सुपीक शेतजमिनी जाण्याची भीती निर्माण झाली असून, शेतकऱ्यांच्या मनात अनिश्चिततेचे ढग दाटले आहेत. विकासाच्या गजरात शेती, पर्यावरण आणि स्थानिकांचे अस्तित्व यांचा विचार खरोखरच होत आहे का, हा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. कोकण हा केवळ भौगोलिक प्रदेश नाही, तर आंबा, काजू, कोकम यांसारख्या फळपिकांवर आधारलेली एक सशक्त अर्थव्यवस्था आहे. या भागातील शेतजमिनी केवळ उत्पादनाचे साधन नसून, त्या पिढ्यानपिढ्यांच्या उपजीविकेचा पाया आहेत. अशा परिस्थितीत मोठ्या प्रमाणावर जमीन संपादनाच्या हालचाली सुरू झाल्या की, शेतकऱ्यांमध्ये अस्वस्थता निर्माण होणे स्वाभाविक आहे. विकासाचा मार्ग शेतकऱ्यांच्या मातीवरूनच का जावा, हा प्रश्न अनुत्तरितच राहतो. नागपूर ते रेड्डी असा प्रस्तावित शक्तिपीठ महामार्ग केवळ धार्मिक स्थळांना जोडणारा मार्ग नसून, तो एक महत्त्वाचा व्यापारी कॉरिडॉर म्हणूनही पुढे येत आहे. माहूर, तुळजापूर, कोल्हापूर यांसारख्या शक्तिपीठांना जोडणारा हा मार्ग धार्मिक पर्यटनाला चालना देईल, असा दावा केला जातो. परंतु, त्यामागे दडलेले व्यावसायिक हितसंबंध अधिक ठळकपणे समोर येत आहेत. विदर्भातील कोळसा आणि कोकणातील लोहखनिज यांचा व्यापार सुलभ करण्यासाठी हा महामार्ग महत्त्वाचा ठरणार आहे, हे स्पष्ट आहे. रेड्डी बंदराचा विकास हा या प्रकल्पाचा केंद्रबिंदू मानला जात आहे. सिंधुदुर्गातील हे ऐतिहासिक बंदर आंतरराष्ट्रीय स्तरावर विकसित करण्याचा विचार पुढे येत आहे. रेवसरेड्डी सागरी महामार्ग आणि नागपूरगोवा शक्तिपीठ महामार्ग अशा दोन मोठ्या मार्गांनी हे बंदर जोडले जाणार आहे. परिणामी, औद्योगिक आणि व्यापारी हालचालींना वेग मिळेल, यात शंका नाही. मात्र, या विकास प्रक्रियेत स्थानिकांचे हित कितपत जपले जाणार, हा खरा प्रश्न आहे. यापूर्वीच कोकणातील अनेक महामार्ग प्रकल्प रखडलेले आहेत. मुंबईगोवा महामार्ग तब्बल १४ वर्षांपासून पूर्णत्वाची वाट पाहत आहे, तर रेवसरेड्डी सागरी महामार्ग २२ वर्षांपासून अपूर्ण आहे. ग्रीनफिल्ड महामार्गाची घोषणा तीन वर्षांपूर्वी झाली, परंतु त्याचीही प्रत्यक्ष अंमलबजावणी अजूनही स्पष्ट नाही. अशा परिस्थितीत नव्या महामार्गांच्या घोषणा केवळ कागदावरच राहणार का, असा संशय निर्माण होतो. सरकारकडून वारंवार दिल्या जाणाऱ्या मुदती आणि त्यांचे वारंवार होणारे अपयश यामुळे जनतेचा विश्वास डळमळीत झाला आहे. मुंबईगोवा महामार्गासाठी दिलेली ३० मे ही 'दहावी डेडलाईन'ही पूर्ण होण्याची शक्यता क्षीण आहे. या पार्श्वभूमीवर नवीन प्रकल्पांच्या घोषणा केल्या जात असल्याने, विकासाच्या धोरणांवर प्रश्नचिन्ह उपस्थित होणे स्वाभाविक आहे. म्हणूनच शक्तिपीठ महामार्ग हा विकासाचा नवा अध्याय ठरू शकतो, पण तो शेतकऱ्यांच्या अश्रूंवर उभा राहू नये, हीच खरी अपेक्षा आहे.

# राजर्षी शाहू महाराजांचे परिवर्तनवादी कार्य



भारतीय समाजाच्या इतिहासात काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात की, त्यांचे कार्य केवळ त्यांच्या काळापुरते मर्यादित राहत नाही, तर ते पुढील अनेक पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरते. अशाच महान, दूरदर्शी आणि समाजपरिवर्तनाला आयुष्य अर्पण करणाऱ्या व्यक्तिमत्त्वांमध्ये राजर्षी शाहू महाराज यांचे नाव अत्यंत आदराने घेतले जाते. ६ मे हा त्यांचा स्मृतिदिन केवळ एक औपचारिक स्मरणदिन नसून, तो सामाजिक समतेच्या, न्यायाच्या आणि मानवतेच्या मूल्यांचा पुनर्विचार करण्याचा दिवस आहे.

राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या राज्यकारभारातून समाजातील विषमता, अन्याय आणि जातीय भेदभाव यांना ज्या पद्धतीने आव्हान दिले, ते भारतीय सामाजिक इतिहासातील एक क्रांतिकारी पर्व ठरले. त्यांच्या कार्यामुळे समाजातील वंचित, दलित, मागासवर्गीय आणि स्त्रिया यांना केवळ संधीच मिळाली नाही, तर सन्मानाने जगण्याचा अधिकारही प्राप्त झाला. म्हणूनच शाहू महाराजांचे कार्य हे केवळ ऐतिहासिक नोंद नाही, तर ते आजच्या आधुनिक भारताच्या सामाजिक रचनेचा एक भक्कम पाया आहे.

राजर्षी शाहू महाराजांचा जन्म २६ जून १८७४ रोजी झाला. त्यांचे मूळ नाव यशवंतराव घाटगे असे होते. लहानपणापासूनच त्यांच्यावर सामाजिक जाणिवांचा प्रभाव होता. त्यांनी समाजातील विषमता आणि अन्याय जवळून अनुभवला होता. पुढे कोल्हापूर संस्थानाच्या गादीवर आरूढ झाल्यानंतर त्यांनी आपल्या सत्तेचा उपयोग केवळ प्रशासनासाठी न करता, समाजपरिवर्तनासाठी करण्याचा निर्णय घेतला. त्यांच्या दृष्टीने राज्यकारभार म्हणजे केवळ सत्ता नव्हती, तर ती एक सामाजिक जबाबदारी होती.

शाहू महाराजांनी शिक्षणाला समाजपरिवर्तनाचे प्रमुख साधन मानले. त्या काळात शिक्षण ही केवळ उच्चवर्गीयांची मक्तेदारी होती. बहुसंख्य समाज शिक्षणापासून वंचित होता. ही परिस्थिती बदलण्यासाठी त्यांनी मोफत आणि सक्तीचे प्राथमिक शिक्षण सुरू केले. त्यांनी दलित, मागासवर्गीय आणि गरीब विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे उभारली, शिष्यवृत्ती दिल्या आणि शिक्षणाची दारे सर्वांसाठी खुली केली. शिक्षणामुळेच व्यक्ती सक्षम होते आणि समाज बदलतो, या विश्वासातून त्यांनी शिक्षणाचा प्रसार केला.

शाहू महाराजांच्या कार्याचा सर्वात महत्त्वाचा आणि क्रांतिकारी पैलू म्हणजे त्यांनी कोल्हापूर संस्थानात १९०२ साली लागू केलेले आरक्षण धोरण होय. त्यांनी सरकारी नोकऱ्यांमध्ये मागासवर्गीयांसाठी ५० टक्के आरक्षण जाहीर केले. हा निर्णय त्या काळातील सामाजिक व्यवस्थेला मोठे आव्हान देणारा होता. आरक्षणाच्या माध्यमातून त्यांनी वंचित घटकांना सत्तेच्या आणि प्रशासनाच्या केंद्रस्थानी स्थान मिळवून दिले. हा निर्णय केवळ धोरणात्मक नव्हता, तर तो सामाजिक न्यायाच्या तत्त्वाचा प्रत्यक्ष अंमल होता.

जातिव्यवस्था आणि अस्पृश्यता ही भारतीय समाजाच्या प्रगतीसाठी मोठी अडचण असल्याचे शाहू महाराजांना जाणवले. त्यांनी अस्पृश्यतेविरुद्ध ठाम भूमिका घेतली. त्यांनी सार्वजनिक विहिरी, तलाव, रस्ते आणि मंदिरे सर्वांसाठी खुले केले. त्यांच्या या निर्णयामुळे समाजातील भेदभाव कमी होण्यास मदत झाली आणि सामाजिक एकात्मतेची भावना वाढीस लागली.

स्त्रियांच्या सक्षमीकरणासाठी शाहू महाराजांनी केलेले कार्यही अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यांनी स्त्रीशिक्षणाला प्रोत्साहन दिले, विधवा पुनर्विवाहाला मान्यता दिली आणि स्त्रियांना स्वावलंबी बनवण्यासाठी विविध उपाययोजना केल्या. त्यांच्या मते, समाजाचा विकास हा स्त्रियांच्या सक्षमीकरणाशिवाय शक्य नाही. त्यामुळे त्यांनी स्त्रियांना समान संधी उपलब्ध करून देण्यावर भर दिला.

आर्थिक क्षेत्रातही शाहू महाराजांनी अनेक सुधारणा केल्या. त्यांनी शेतकऱ्यांच्या हितासाठी धोरणे राबवली, सहकारी चळवळीला प्रोत्साहन दिले आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी दिली. त्यांनी शेतकऱ्यांना कर्जसवलती, सिंचन सुविधा आणि बाजारपेठ उपलब्ध करून दिली. त्यांच्या या प्रयत्नांमुळे ग्रामीण भागातील आर्थिक स्थिती सुधारली.

शाहू महाराजांच्या कार्यात धर्मनिरपेक्षतेचा स्पष्ट प्रभाव दिसतो. त्यांनी सर्व धर्मांना समान वागणूक दिली आणि धार्मिक सहिष्णुतेचा पुरस्कार केला. त्यांच्या दृष्टीने मानवता हीच सर्वोच्च मूल्य होती. त्यांनी कोणत्याही धर्माच्या किंवा जातीच्या आधारावर भेदभाव केला नाही.

त्यांच्या कार्याचा प्रभाव पुढील अनेक समाजसुधारकांवर पडला आणि भारतीय संविधानातील समता, स्वातंत्र्य आणि बंधुता या मूल्यांना त्यांनी अप्रत्यक्ष प्रेरणा दिली. त्यांच्या विचारांमुळे समाजातील वंचित घटकांना आत्मविश्वास मिळाला आणि त्यांनी प्रगतीचा मार्ग धरला.

आजच्या काळात शाहू महाराजांचे विचार अधिकच महत्त्वाचे ठरतात. अजूनही समाजात विषमता, भेदभाव आणि अन्याय अस्तित्वात आहेत. अशा परिस्थितीत त्यांच्या विचारांचा पुनर्विचार करणे आवश्यक आहे. त्यांनी दाखवून दिले की, सामाजिक न्यायासाठी केवळ कायदे पुरेसे नसतात, तर त्यासाठी समाजाची मानसिकता बदलणे आवश्यक असते.

शाहू महाराजांचे कार्य केवळ सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रापुरते मर्यादित नव्हते, तर त्यांनी सांस्कृतिक क्षेत्रातही महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांनी लोककलांना प्रोत्साहन दिले, कलाकारांना संरक्षण दिले आणि समाजातील सांस्कृतिक विविधतेचा सन्मान केला. त्यांच्या कारकीर्दीत कोल्हापूर हे एक सांस्कृतिक केंद्र म्हणून विकसित झाले. त्यांनी समाजातील प्रत्येक घटकाच्या सांस्कृतिक अभिव्यक्तीला वाव दिला, ज्यामुळे समाजात आत्मसन्मानाची भावना वाढीस लागली.

शाहू महाराजांनी पत्रकारिता आणि प्रसारमाध्यमांचा उपयोगही समाजजागृतीसाठी केला. त्यांनी विविध वृत्तपत्रांना प्रोत्साहन दिले आणि सामाजिक प्रश्नांवर खुल्या चर्चेला चालना दिली. त्यांच्या मते, समाजातील बदलासाठी विचारांची देवाणघेवाण आणि संवाद अत्यंत आवश्यक आहे. त्यांनी लोकशाही मूल्यांचा पुरस्कार केला आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याला पाठिंबा दिला.

धर्माच्या बाबतीतही शाहू महाराजांची भूमिका अत्यंत प्रगत होती. त्यांनी धर्माला वैयक्तिक श्रद्धेचा विषय मानले आणि राज्यकारभारात धर्मनिरपेक्षतेचा अवलंब केला. त्यांनी सर्व धर्मांना समान वागणूक दिली आणि धार्मिक सहिष्णुतेचा पुरस्कार केला. त्यांच्या दृष्टीने समाजातील ऐक्य आणि बंधुता टिकवण्यासाठी धर्मनिरपेक्षता अत्यंत आवश्यक होती.

शाहू महाराजांच्या कार्याचा एक महत्त्वाचा पैलू म्हणजे त्यांनी सामाजिक न्यायाच्या लढ्याला मानवी मूल्यांशी जोडले. त्यांनी केवळ धोरणे राबवली नाहीत, तर समाजाच्या मानसिकतेत बदल घडवून आणण्याचा प्रयत्न केला. त्यांनी लोकांना समतेचे, बंधुत्वाचे आणि सहिष्णुतेचे महत्त्व पटवून दिले. त्यांच्या या प्रयत्नांमुळे समाजात सकारात्मक बदल घडून आला.

आजच्या काळात शाहू महाराजांच्या कार्याचा विचार करताना आपण त्यांच्या धोरणांचा आणि विचारांचा आधुनिक संदर्भात पुनर्विचार करणे आवश्यक आहे. आज भारतात शिक्षण, आरक्षण, सामाजिक न्याय आणि स्त्रीसक्षमीकरण या क्षेत्रांमध्ये अनेक प्रगती झाली आहे, परंतु अजूनही अनेक आव्हाने अस्तित्वात आहेत. समाजातील काही घटक अजूनही शिक्षण, आरोग्य आणि रोजगाराच्या संधींपासून वंचित आहेत.

आरक्षण धोरणांवर आजही मोठ्या प्रमाणावर चर्चा आणि वादविवाद होत आहेत. काहीजण आरक्षणाला विरोध करतात, तर काहीजण त्याचे समर्थन करतात. या वादांच्या पार्श्वभूमीवर शाहू महाराजांचे विचार अत्यंत महत्त्वाचे ठरतात. त्यांनी आरक्षणाला एक तात्पुरती पण आवश्यक उपाययोजना मानली होती, जी समाजातील विषमता दूर करण्यासाठी आवश्यक आहे.

राजर्षी शाहू महाराजांच्या कार्याचा आणि विचारांचा सखोल अभ्यास केल्यानंतर एक गोष्ट स्पष्टपणे लक्षात येते की, त्यांनी ज्या प्रकारे सामाजिक न्याय, समता आणि मानवतेच्या मूल्यांना आपल्या कारभाराच्या केंद्रस्थानी ठेवले, ते आजच्या आधुनिक लोकशाही व्यवस्थेसाठीही अत्यंत मार्गदर्शक आहे. राजर्षी शाहू महाराज यांचे कार्य केवळ एका संस्थानापुरते मर्यादित राहिले नाही, तर त्याचा प्रभाव संपूर्ण भारतीय समाजव्यवस्थेवर पडला. त्यांनी समाजातील विषमता दूर करण्यासाठी जे उपाययोजना केल्या, त्या आजही सामाजिक धोरणांच्या मुळाशी आढळतात.

आजच्या भारतात संविधानिक पातळीवर समता, स्वातंत्र्य आणि बंधुता ही मूल्ये मान्य केली गेली आहेत. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्गीयांसाठी आरक्षणाची व्यवस्था केली गेली आहे. स्त्रियांसाठी विविध सक्षमीकरणाच्या योजना राबवल्या जात आहेत. शिक्षण सर्वांसाठी उपलब्ध करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. या सर्व प्रक्रियांमध्ये शाहू महाराजांच्या विचारांची छाप स्पष्टपणे दिसून येते. त्यांनी मांडलेली 'समान संधी' ही संकल्पना आजच्या धोरणांचा पाया बनली आहे.

शाहू महाराजांनी समाजपरिवर्तनासाठी केवळ धोरणात्मक बदल केले नाहीत, तर त्यांनी समाजाच्या मानसिकतेतही परिवर्तन घडवून आणण्याचा प्रयत्न केला. त्यांनी लोकांमध्ये समतेची, बंधुत्वाची आणि सहिष्णुतेची भावना निर्माण केली. आजच्या काळातही सामाजिक न्यायाची खरी अंमलबजावणी करण्यासाठी समाजातील मानसिकतेत बदल होणे अत्यंत आवश्यक आहे. त्यांच्या कार्याचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे त्यांनी प्रशासनाला लोकाभिमुख बनवले. त्यांनी सत्तेचा वापर समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी केला. आजच्या काळातही प्रशासन अधिक संवेदनशील, पारदर्शक आणि लोककेंद्रित बनवण्याची गरज आहे. या संदर्भात शाहू महाराजांचे कार्य प्रेरणादायी ठरते.

राजर्षी शाहू महाराजांच्या स्मृतिदिनानिमित्त आपण केवळ त्यांना श्रद्धांजली अर्पण करून थांबू नये, तर त्यांच्या विचारांचा आणि कार्याचा आत्मसात करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन आपण समाजातील विषमता, अन्याय आणि भेदभाव दूर करण्यासाठी सक्रिय भूमिका घेतली पाहिजे. सामाजिक न्याय ही केवळ सरकारची जबाबदारी नसून, ती प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे, हे त्यांनी आपल्या कार्यातून दाखवून दिले.

शेवटी, राजर्षी शाहू महाराजांचे जीवनकार्य हे भारतीय समाजाच्या इतिहासातील एक उज्ज्वल पर्व आहे. त्यांनी समतेचा दीप प्रज्वलित केला, सामाजिक न्यायाचा मार्ग दाखवला आणि मानवतेचा संदेश दिला. त्यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांना विनम्र अभिवादन करताना आपण त्यांच्या विचारांचा प्रचार आणि प्रसार करण्याचा संकल्प करूया. त्यांच्या आदर्शांचा अवलंब करून आपण एक समताधिष्ठित, न्याय्य आणि सशक्त भारत निर्माण करू शकतो हीच त्यांना खरी आणि अर्थपूर्ण श्रद्धांजली ठरेल.

**–डॉ. राजेंद्र बगाटे**
हिंगोली
मो.९९६०१०३५८२

# भावनिक आधाराने होते दुःखाचे निवारण

संकटे येतात आणि जातात. समज-गैरसमज होत राहतात. माणसे भेटतात पुन्हा दुरावतात. संकटांत खंबीर असणे महत्त्वाचे. अचानक येणाऱ्या संकटाने, दुःखाने प्रत्येक माणूसच सुरुवातीला थोडासा चळतो, ढळतो. हे अगदी सहाजिकच आहे. निसर्गनियम आहे. अशा परिस्थितीत खऱ्याअर्थाने त्याला मानसिक आधाराची गरज असते. भावनिक खंबीरतेची आवश्यकता असते. यासाठी माणूस आपुलकीच्या चार शब्दांची वाट पाहत असतो. खंबीर बनवणाऱ्या माणसाचा शोध घेत असतो. मोकळे होण्यासाठी मनमोकळे बोलण्याची गरज असते. त्यासाठी कुणाच्यातरी हृदयात स्वतःची जागा हवी असते.

घाबरू नको संकटाना
म्हणून कायम धीर देणारं
कोणीतरी असावं लागतं
खांद्यावर हात ठेवून लढ म्हणणारं

मानसिक, भावनिक बळ प्रेमाच्या चार शब्दांनी मिळते. आपुलकीचे चार शब्द खूप मोठी प्रेरणा देतात, प्रोत्साहन देतात. संकटाला सामना करण्यासाठी 'उभं' करतात. अडचणींना सामोरे जाण्याचे धैर्य देतात. दुःख पचवण्याची शक्ती देतात. आपले आधारस्तंभ कोण असतील हे आपले अंतर्मन ठरवत असते. आपले आदर्श आणि जवळचे हेच आधारस्तंभ असतात. ही कविता सगळ्यांनाच आठवत असेल

खिशाकडे हात जाताच
हसत हसत उठला
पैसे नको सर मला
जरा एकटेपणा वाटला
मोडून पडला संसार सारा
तरी मोडला नाही कणा
पाठीवरती हात ठेवूनी
फक्त लढ म्हणा...

आपल्या आदर्श असणाऱ्या, भावनिक आधार देणाऱ्या गुरुजीने पाठीवर हात ठेवून लढ म्हटल्यावर कोणत्याही तुफानाला सामोरे जाण्याची ताकद आमच्यामध्ये येते. ती याच आपुलकीच्या शब्दाने. कौतुक करणाऱ्या, धैर्य देणाऱ्या दोन वाक्यांनी माणूस उभा राहतो. माणसे आयुष्यभर आधार शोधत राहतात. यशस्वी जीवन जगण्यासाठी मानसिक ताकद देणारे चार शब्द हवेच असतात.

आजच्या काळात हेच आपुलकीचे चार शब्द फार महत्त्वाचे आहेत. संकट आपल्यापर्यंत येईस्तोवर आपण खंबीर असतो. एकदा का संकट आले की एका क्षणात कोलमडून पडतो. चांगली चांगली खंबीर माणसे डगमगतात, धडपडतात, कोसळतात. वेळ आल्यावर प्रत्येकालाच भीती वाटते. माणसे जेवढी आलेल्या संकटाने खचत नाहीत. त्यापेक्षा जास्त त्याच्या भीतीने गर्भगळीत होत असतात. अनेकांना या ताणतणावांचे समायोजन करता येत नाही. अनेकजण याचे बळी होत असतात. खरी गरज आहे भावनिक, मानसिक भक्कमपणाची. संकटाला तोंड देणाऱ्या खंबीर मनाची, भरभक्कम हृदयाची!

स्तुती, कौतुक, प्रोत्साहन फार आवश्यक आहे. ते कुणालाही हवेहवेसे वाटते, मानसिक बळ देते. पुढील कार्यास ताकद मिळते. आणखी जोमाने, धडपडीने माणूस कामाला लागतो. जेवढे करतोय; त्यापेक्षा जास्त चांगले करण्याचा प्रयत्न करतो. आपल्यातील सर्व क्षमतांचा, बुद्धीचा आणि कौशल्यांचा पुरेपूर वापर करण्याची धडपड सुरू होते. आपल्या चांगल्या कामाची दखल घेतलेली, कुणालाही भावते. प्रेरणा मिळून माणूस खऱ्या अर्थाने जागृत होतो. एकंदरीतच कौतुकाने, प्रशंसा केल्याने माणूस घडत जातो.

खरे पाहता कौतुक करण्यासाठी, प्रशंसा करण्यासाठी, दुसऱ्याला चांगले म्हणण्यासाठी माणसाचे मन खूप मोठे असावे लागते. अंतःकरणात उदारता असावी लागते. दुसऱ्याला समजून घेण्याची क्षमता असावी लागते. आपल्या स्वतःच्या भावना आणि संवेदना जाग्या असाव्या लागतात. त्यासोबतच आपल्यातला 'मी'पणा, अहंकार नष्ट नाही तर नाही; पण किमान कमी व्हावा लागतो. तरच निखळ कौतुक शक्य असते. दुसऱ्याला वाईट बोलणे, निंदानालस्ती करणे, कमी लेखणे सहज शक्य असते. चुका काढणे; हा तर माणसाचा स्थायीभाव असतो. खरेतर कौतुक करणे आणि चुका सुधारणे हा स्वभाव बनायला पाहिजे.

चांगल्याला चांगले म्हणायची सवय लागली. उत्तम कार्याची प्रशंसा होऊ लागली. मग सगळे जग आपल्याला आपले वाटते. कुणीही, काहीही चांगले केले तरी ते आपल्याला भावते. तोंड भरुन कौतुक करावे वाटते. उदात्ततेन मन भारावून जाते. उत्कृष्टतेचे कौतुक केल्याशिवाय मनाला स्वस्थता मिळत नाही. स्वतःबद्दलचा दुराभिमान, विनाकारण जोपासलेला अहंकार आपोआप विरघळू लागतो. 'मी'पणा कुठल्या कुठे निघून जातो. खऱ्या अर्थाने सुंदर असलेले जग अधिक सुंदर दिसायला लागते.

दुसऱ्याचे कौतुक करता करता आपणही मनाने कधी मोठे होतो...? हे आपल्यालाही कळत नाही. चांगले बोलता-बोलता, चांगले म्हणता म्हणता, चांगले वागता-वागता मनाने, अंतकरणाने, विचाराने आपण आपणही चांगले होतो. विशेष म्हणजे चांगले बोलण्यासाठी, दुसऱ्याची स्तुती करण्यासाठी, कौतुक करण्यासाठी मनाचा मोठेपणा सोडला तर दुसरे काहीच लागत नाही. एखाद्याबद्दल चांगलेच बोलायचे असेल तर त्याची फारशी माहिती नसली तरी चालते. त्याचा पूर्ण जीवनपट माहीत नसला तरी आपण खूप छान लिहू शकतो, बोलू शकतो.

खरेतर आजचा काळ असा आहे.... विचार कसे आहेत...? यापेक्षा विचार कोणाचे आहेत...? याला महत्त्व आहे. काम किती चांगला आहे..? किती तन्मयतेने केला आहे ? यापेक्षा ते कोणी केला आहे..? याला जास्त महत्त्व दिल्या जात आहे. गवगवा करणारे, आपली चांगली जाहिरात करू शकणारे, उत्तम ओळख-पाळख असणारे लोकच आज पुढे जाऊ शकत आहेत. गुणवत्ता हा निकषच उरलेला नाही. तुम्ही किती छान मांडता... तुमचे विचार किती उत्कृष्ट आहेत यापेक्षा तुमच्या मागे लोकवलय किती आहे...? हेच पाहिल्या जाते... हीच प्रचंड मोठी शोकांतिका आहे. तुमचे विचार, तुमची शब्दरचना, तुमची मांडणी पाहण्यापेक्षा तुम्ही कोण आहात..? हेच पहिल्या जाते. आपल्या जवळची, आपल्या ओळखीची माणसे आपली जेवढी स्तुती करत नाहीत, आपल्याबद्दल चांगले बोलत नाहीत. त्यापेक्षा जास्त अपरिचित अनोळखी माणसे आपले कौतुक करतात. आपल्याला चांगले म्हणतात. त्यावेळी माणसाचे मन भरून येते. खरेच काहीतरी चांगले केल्याचे समाधान मिळते. कौतुकाचे दोन शब्द माणसाच आयुष्य बदलून टाकतात. प्रेरणा देतात, प्रोत्साहन देतात. चांगल्या मार्गावर चालण्यासाठी बळ देतात. मनातली आणखी चांगले करण्याची इच्छा वाढवतात. लढायला शिकवतात. म्हणूनच आपुलकीने 'फक्त लढ म्हणणारे' गुरुजी दहा हत्तीचे बळ देतात...

**–मयूर मधुकरराव जोशी**
ग्रीन पार्क, जिंतूर, जि. परभणी
मो. ९७६७७३३५६०

# देगलूर शहरातील एक आशादायी नेतृत्त्व ॲड. अंकुश देसाई

देगलूर शहराचे नवनिर्वाचित उपनगराध्यक्ष व शिवस्मारक समितीचे अध्यक्ष आमचे मित्र ॲड. अंकुश सुरेशराव देसाई यांचा आज वाढदिवस. त्यानिमित्त त्यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकण्याचा अल्पसा प्रयत्न.

राजकारणापलीकडे मैत्री जपणारा नेता म्हणून ॲड. अंकुश सुरेशराव देसाई यांच्याकडे पाहिले जात आहे. सर्वसामान्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी त्यांच्या सुख-दुःखात धावून जाणारा व अशावेळी कोणताही विचार न करता मदतीसा पुढे हात करणारा एक



सच्चा माणूस म्हणून त्यांची परिसरातील ओळख निर्माण झाली आहे. सामाजिक भावना जपणारा व देगलूर शहरातील समस्यांची जाण असणारा असा माणूस सदैव लोकांचा विचार करणारा व लोकांमध्ये राहणारा स्वखर्चातून लोकांची पाण्याची समस्या सोडविणारा दुर्मिळ व्यक्तिमत्व अशा शब्दांत देगलूर परिसरात त्यांच्या नावाची चर्चा होत आहे.

समाजकार्यात नेहमी अग्रेसर राहणारे ॲउ. अंकुश देसाई यांनी देगलूर येथे सर्वांच्या सहकार्याने भव्य शिवस्मारक उभारण्याचे कार्य पूर्ण केले. अनेक अडचणी असतानासुद्धा सर्वांचे सहकार्य घेऊन अखेर शिवस्मारकाचे कार्य पूर्णत्वास नेले. देसाई यांच्यामुळेच आज येथे छत्रपती शिवाजी महाराज यांचा भव्य असा अश्वारूढ पूर्णाकृती पुतळा दिमाखदारपणे उभा आहे.

देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली दरवर्षी शिवजयंतीच्या दिवशी अनेक सामाजिक व समाजोपयोगी कार्यक्रम येथे घेतले जातात. समाजप्रबोधनाचे कार्यक्रम घेतले जातात व मोठ्या प्रमाणात अन्नदानसुद्धा करण्यात येते. खरोखरच याचे सर्व श्रेय ॲड. अंकुश देसाई यांना जाते. शिवस्मारक समितीच्या अध्यक्षपदाची धुरा ते व्यवस्थित सांभाळत आहेत. देगलूर तालुक्यातील तरुणांचे आवडीचे नेतृत्त्व व आशादायी नेतृत्व म्हणून सर्व समाज त्यांच्याकडे पाहात आहे. तरुणांमध्ये आघाडीचे नेतृत्व आहे. समाजातील सर्व क्षेत्रातील लोकांसोबत त्यांचे मैत्रीपूर्ण संबंध आहेत. आज ५१ व्या वाढदिवशी आई तुळजाभवानी आपणास उदंड आयुष्य देवो अशी कामना करतो व पुढील कार्यासाठी खूप खूप शुभेच्छा देतो.

**–डॉ. आनंद जाधव**
बालरोग तज्ज्ञ
हाळीकर हॉस्पिटल
शहाजी नगर, देगलूर

# जनगणनेसाठी नांदेड तहसील प्रशासन सज्ज; स्वगणना सुरू, १६ मे ते १४ जूनपर्यंत होणार घरांची नोंदणी

**नांदेड (प्रतिनिधी)–** भारत सरकारतर्फे भारताची जनगणना अंतर्गत जनगणना २०२७ ही देशव्यापी महत्त्वपूर्ण प्रक्रिया राबविण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर सर्व नागरिकांना स्वगणना (Self Enumeration) तसेच प्रत्यक्ष घरभेटीद्वारे होणाऱ्या लोकसंख्या गणनेत सक्रिय सहभाग नोंदविण्याचे आवाहन तहसीलदार नांदेड यांनी केले आहे.



जनगणना ही देशाच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत महत्त्वाची असून, शिक्षण, आरोग्य, पायाभूत सुविधा, रोजगार निर्मिती, शासकीय योजना यांचे प्रभावी नियोजन यासाठी अचूक लोकसंख्येची माहिती आवश्यक असते.

नागरिकांनी उपलब्ध करून देण्यात आलेल्या अधिकृत डिजिटल प्लॅटफॉर्मद्वारे स्वतःची व कुटुंबाची माहिती अचूक व वेळेत भरावी. स्वगणना ही सोपी, सुरक्षित व वेळ वाचवणारी प्रक्रिया आहे. योग्य माहिती देणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे.

भारताची जनगणना २०२७ ची सुरुवात स्वजनगणनेद्वारे दिनांक १ मे २०२६ पासून सुरु झाली आहे. स्वजनगणना ही १ मे २०२६ ते १५ मे २०२६ या कालावधीमध्ये सर्वांनी करून घ्यावी. स्वगणना म्हणजे स्वतःच्या कुटुंबाची माहिती स्वतः नोंदविणे ही प्रक्रिया अत्यंत सोपी आहे यात आपण आपली व आपल्या कुटुंबाची अचूक माहिती नोंदवण्यासाठी खालील प्रक्रिया पूर्ण करावी त्यासाठी जनगणना संचालनालयाने https://se.census.gov.in हे अधिकृत संकेतस्थळ तयार केले आहे. स्वगणनेचे टप्पे खालील प्रमाणे आहेत.

वरील संकेतस्थळावर लॉग इन करा. आपले राज्य व आवश्यक माहिती भरा. कुटुंबप्रमुखाचा मोबाईल क्रमांक व ईमेल आयडी नोंदवा. मोबाईल नंबर प्रत्येक कुटुंबासाठी वेगवेगळ्या वापरावा, एकदा नोंदणी केलेला मोबाईल नंबर पुन्हा बदलता येणार नाही याची नोंद घ्यावी. आपल्या सोयीची भाषा निवडा आणि मोबाईलवर आलेला ओटीपी नमूद करा. स्थानाबाबत जिल्हा तालुका शहर व स्थानिक माहिती अचूक भरा.

नकाशावर आपल्या घराचे अचूक स्थान मार्क करा. प्रश्नावली भरा कुटुंब प्रमुख कुटुंबातील सर्व सदस्यांची माहिती व्यवस्थित भरा.

भरलेली माहिती पुन्हा तपासा आणि आवश्यकता भासल्यास दुरुस्ती करा. फायनल सबमिट करा. त्यानंतर आपल्याला एक कोड नंबर प्राप्त होईल ज्याला आपण SE ID म्हणतो तो आपण जतन करून ठेवावा अथवा स्क्रीन शॉट काढून ठेवावा. तुम्हाला ई-मेलवर व टेक्स्ट मेसेज सुद्धा याचा प्राप्त होईल.

यानंतरच्या टप्प्यात दिनांक १६ मे नंतर जनगणना प्रगनक आपल्या घरी भेट देऊन माहितीशी पडताळणी करतील. त्यांना अचूक माहिती तुम्ही देणे आवश्यक आहे. त्यावेळी आपण त्यांना स्वगणना केल्यानंतर जो डए खऊ प्राप्त झाला आहे तो प्रगनकाला द्यावा.

दिनांक १६ मे ते १४ जून २०२६ या कालावधीमध्ये घरांची माहिती घर नोंदणी व निवास माहिती House Listing टप्पा पार पडणार आहे व फेब्रुवारी २०२७ मध्ये प्रत्यक्ष लोकसंख्या मोजणी होणार आहे.

नांदेड तालुक्यामध्ये महानगरपालिका क्षेत्राची जनगणनाबाबत प्रक्रिया नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका यांच्यामार्फत राबविली जाणार आहे. नांदेड ग्रामीणची जनगणना नांदेड तहसील कार्यालयामार्फत राबविली जाणार आहे. जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या मार्गदर्शनाखाली नांदेड ग्रामीण जनगणनेसाठी प्रशासकीय पूर्ण तयारी झाली आहे. नांदेड ग्रामीणमध्ये २७५ प्रगनक व ५० पर्यवेक्षक यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांचे चार टप्प्यात प्रशिक्षण पूर्ण करण्यात आले आहे.

# खा. अशोक चव्हाण यांनी केली स्वगणना



**नांदेड (प्रतिनिधी)–** भारताच्या प्रथम डिजिटल जनगणना (जनगणना २०२७) मोहिमेला सुरुवात झाली असून, महापालिका क्षेत्रातील स्वगणनेचा शुभारंभ १ मे रोजी महापौर कविता मुळे यांच्या हस्ते करण्यात आला होता. त्याअनुषंगाने माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोक चव्हाण यांनी ५ मे रोजी महानगरपालिकेच्या 'स्वगणना' (Self-Enumeration) उप-क्रमांतर्गत त्यांच्या निवासस्थानी स्वतःची माहिती नोंदवून या मोहिमेत आपला सहभाग नोंदविला आहे. या प्रसंगी भोकर मतदारसंघाच्या आमदार श्रीजया चव्हाण, महापालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, क्षेत्रिय अधिकारी रमेश चवरे, कनिष्ठ अभयंता रविंद्र सरपाते आदी उपस्थित होते.

खासदार चव्हाण यांनी जनगणनेचे महत्त्व स्पष्ट करताना सांगितले की, शहराच्या भविष्यातील नियोजन आणि केंद्र व राज्य सरकारच्या योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी अचूक आकडेवारी असणे आवश्यक आहे. त्यांनी स्वतःची माहिती ऑनलाईन पोर्टलवर भरून नांदेडमधील नागरिकांसाठी या प्रक्रियेची सुरुवात केली. नांदेडमधील सर्व नागरिकांनी आपल्या कुटुंबाची अचूक माहिती 'स्व-गणना' पोर्टलवर वेळेत नोंदवून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी महापालिका आयुक्तांनी मनपा प्रशासनाकडून या प्रक्रियेसाठी करण्यात आलेल्या तांत्रिक तयारीची माहिती खासदारांना दिली. नागरिकांनी उपलब्ध करून देण्यात आलेल्या अधिकृत डिजिटल प्लॅटफॉर्मद्वारे स्वतःची व कुटुंबाची माहिती अचूक व वेळेत भरावी. स्वगणना ही सोपी, सुरक्षित व वेळ वाचवणारी प्रक्रिया आहे. योग्य माहिती देणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी असल्याचे नमूद करताना महानगरपालिका क्षेत्राची जनगणना प्रक्रिया नांदेड वाघाळा शहर महानगरपालिके मार्फत राबविली जाणार असल्याचे यावेळी पालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांनी सांगितले.

या प्रसंगी बोलताना खा. अशोकराव चव्हाण म्हणाले केले की, नांदेडकरांनी या पहिल्या डिजिटल जनगणनेत उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवावा. स्व-गणनेमुळे वेळेची बचत होईल आणि अचूक माहिती संकलित करण्यास मदत होईल. विकासाच्या नियोजनासाठी जनगणना अत्यंत महत्त्वाची असल्याने प्रत्येक नागरिकाने आपले राष्ट्रीय कर्तव्य पार पाडावे.

# जुनी पेन्शन लागू करण्याच्या मागणीसाठी कर्मचाऱ्याचे आमरण उपोषण सुरू

**हदगाव (प्रतिनिधी)** –जुनी पेन्शन योजना सर्व कर्मचाऱ्यांना लागू करावी या प्रमुख मागणीसाठी ज्ञानवर्धिनी हायस्कूल, ल्याहारी (ता. हदगाव, जि. नांदेड) येथील कर्मचारी मिलिंद चौरे यांनी आमरण उपोषणाचा मार्ग स्वीकारला आहे. हे उपोषण तालुका हदगाव येथील तहसील कार्यालयासमोर सुरू करण्यात आले.

या उपोषणात सहभागी कर्मचारी हे २००५ पूर्वी नियुक्त झालेले असून, अंशतः अनुदानित शाळांमध्ये कार्यरत आहेत. शासनाने त्यांच्या सेवेला मान्यता देत जुनी पेन्शन योजना लागू करावी, अशी त्यांची ठाम मागणी आहे. सध्या नव्या पेन्शन योजनेमुळे निवृत्तीनंतर आर्थिक असुरक्षितता निर्माण होत असल्याचे आंदोलनकर्त्यांचे म्हणणे आहे.

उपोषणकर्त्यांनी सांगितले की, अनेक वर्षे प्रामाणिकपणे सेवा बजावूनही त्यांना निवृत्तीवेतनाचा लाभ मिळत नाही, ही मोठी अन्यायकारक बाब आहे. त्यामुळे शासनाने तत्काळ सकारात्मक निर्णय घ्यावा अन्यथा आंदोलन तीव्र करण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

या उपोषणस्थळी विविध सामाजिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवरांनी भेट देत आंदोलनकर्त्यांना पाठिंबा दर्शविला आहे. तसेच सेवानिवृत्त मुख्याध्यापक सूर्यकांत दुधारे यांनी मिलिंद चौरे यांना उपोषणादरम्यान आर्थिक मदतही केली आहे. तसेच इतरांनीही उपोषणकर्त्यांच्या कुटुंबास लागणारी आर्थिक मदत करण्याचे आवाहन केले आहे.

जुनी पेन्शन योजना प्रकरण या घडीला सुप्रीम कोर्टात प्रलंबित असल्याचे सर्वांनाच माहीत आहे परंतु निर्णय घेण्यास विलंब होत आहे तोपर्यंत प्रशासनात जाग आणण्यासाठी ह्या कर्मचाऱ्यांनी आमरण उपोषणाचा मार्ग अवलंबिला आहे.

# महसूल विभागाकडून 'समाधान शिबीर' उपक्रमास नागरिकांचा प्रतिसाद



**नायगाव बाजार(प्रतिनिधी)–** महसूल विभागाच्या सेवा थेट नागरिकांच्या दारी पोहोचवून प्रशासन अधिक गतिमान व लोकाभिमुख करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या 'समाधान शिबिरा'ला नरसी मंडळ परिसरातील ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. छत्रपती शिवाजी महाराज अभियानांतर्गत हे शिबीर नरसी येथे पार पडले.

या शिबिराला नायगाव मतदार संघाचे आ. राजेश पवार यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच तहसीलदार डॉ. धम्मप्रिया गायकवाड यांनी मार्गदर्शन केले. यावेळी नायब तहसीलदार विजय येरावाड, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. श्रीकांत पटवेकर, कृषी अधिकारी दिपेश देवरे, मंडळ अधिकारी शीतल स्वामी, सचिन आरू, ग्रामपंचायत अधिकारी नागेश यरसनवार, ग्राम महसूल अधिकारी शाम मुंडे, पोलीस पाटील इब्राहीम बेग पटेल, महात्मा गांधी तंटामुक्त समितीचे अध्यक्ष गंगाधर वडगावे आदी मान्यवर उपस्थित होते.

शिबिरात विविध शासकीय योजनांची माहिती नागरिकांना देण्यात आली. आयुष्यमान भारत योजनेअंतर्गत आरोग्य विमा लाभ, सिद्धपत्रिका, जातीचे प्रमाणपत्र, सातबारा उतारा आदी आवश्यक कागदपत्रांचे वितरण करण्यात आले. तसेच संबंधित विषयांवर नागरिकांना सविस्तर मार्गदर्शनही करण्यात आले. महिला व बाल विकास प्रकल्पांतर्गत लाभार्थींना 'बेबी किट'चे वाटप करण्यात आले.

यावेळी नागरिकांच्या विविध समस्यांबाबत अर्ज स्वीकारण्यात आले असून, त्या तातडीने निकाली काढण्याचे आश्वासन प्रशासनाकडून देण्यात आले. गावपातळीवरच प्रशासकीय सेवा उपलब्ध करून देण्याच्या या उपक्रमामुळे नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.

शिबिराच्या यशस्वीतेसाठी ग्राम महसूल अधिकारी संघटनेचे तालुकाध्यक्ष श्याम मुंडे, एस. एम. कोनाळे, पंजाबराव मोरे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्येष्ठ पत्रकार गंगाधर गंगासागरे यांनी केले. या शिबिराला नरसी, मुगाव, कुंचेली, धानोरा, टाकळी, शेळगाव (गौरी), धुप्पा आदी गावांतील नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रशासनाच्या या उपक्रमामुळे शासनसेवा अधिक सुलभ व परिणामकारक होत असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली.

# सिडको येथील महात्मा गांधी शाळेत पहिल्या वर्गातील नवागतांचे स्वागत

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** सेवादास शिक्षण प्रसारक मंडळ संचालित महात्मा गांधी प्राथमिक शाळेत १ मे रोजी महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने संस्थेचे कोषाध्यक्ष ॲड. श्रीनिवास जाधव यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले तर महात्मा गांधी प्राथमिक शाळेत शाळापूर्व तयारी, पालक मेळावा व पहिली वर्गातील नवागतांचे स्वागत करण्यात आले.

१ मे २६ रोजी महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने महात्मा गांधी प्राथमिक विद्यालय सिडको येथे शाळापूर्व तयारी मेळावा आयोजित करण्यात आला. तसेच संस्थेचे कोषाध्यक्ष ॲड. श्रीनिवास जाधव यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

ध्वजारोहणासाठी महात्मा गांधी प्राथमिक विद्यालयातील सर्व कर्मचारी, मुख्याध्यापक राऊत तसेच महात्मा गांधी हायस्कूलचे मुख्याध्यापक सांगळे व सर्व कर्मचारी महात्मा गांधी डीएड, बीएड कॉलेजचे प्राचार्य घुले व सर्व कर्मचारी उपस्थित होते.

# शंकरनगरातील विकास कामांत घोळ? नागरिकांमध्ये संताप

**शंकरनगर (प्रतिनिधी)–** शंकरनगर परिसरातील काही गावांमध्ये सध्या विकास कामांबाबत धक्कादायक प्रकार समोर येत आहेत. जनतेच्या सेवेसाठी निवडून आलेले काही लोकप्रतिनिधीच ठेकेदार बनल्याचा गंभीर आरोप ग्रामस्थांकडून होत आहे. यामुळे कामांच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

गावागावांत सुरू असलेले रस्ते, नाली व पाणीपुरवठा यांसारखी कामे प्रत्यक्षात निकृष्ट दर्जाची होत असल्याचे दिसून येत आहे. काही ठिकाणी नाल्या पूर्ण होण्याआधीच तुटल्या, तर नव्याने बनवलेले रस्ते काही दिवसांतच उखडल्याचे चित्र आहे.

ग्रामस्थांचा थेट आरोप आहे की, काम करणारा आणि काम तपासणारा एकच असेल, तर भ्रष्टाचार थांबणार कसा? त्यामुळे तक्रार करायची तरी कोणाकडे, असा संतप्त सवाल नागरीक करत आहेत.

स्थानिक पातळीवर अशीही चर्चा रंगत आहे की, कामांमध्ये दर्जाहीन साहित्य वापरून कागदोपत्री काम पूर्ण दाखवले जात आहे. यामुळे शासनाचा निधी वाया जात असून, सामान्य जनतेला मात्र निकृष्ट सुविधा सहन कराव्या लागत आहेत. ग्रामस्थांनी या प्रकरणाची चौकशी करून संबंधितांवर कारवाई करावी, तसेच सर्व कामांचे सोशल ऑडिट करून पारदर्शकता आणावी, अशी मागणी केली आहे.

# कृत्रिम बुद्धिमत्ता समजून घेणे काळाची गरज –डॉ. निलेश इंगळे

**नांदेड (प्रतिनिधी)** –आज सगळ्याच क्षेत्रांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर सुरू झालेला आहे. दिवसेंदिवस तो वाढत जाणार आहे. त्यामुळे प्रत्येकाने कृत्रिम बुद्धिमत्तेला समजून घेणे गरजेचे असून, ती आता काळाची गरज झाली, असे प्रतिपादन डॉ. निलेश इंगळे यांनी केले. ते इंदिरा गांधी वरिष्ठ महाविद्यालय सिडको नवीन नांदेडच्या स्टडी सर्कलच्या वतीने आयोजित ग्रंथावर बोलू काही या उपक्रमाचे बारावे पुष्प गुंफताना प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते.




या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य दुर्गेश रवदे यांची तर संयोजक डॉ. हनुमंत भोपाळे यांची प्रमुख उपस्थिती होती. संत तुकडोजी महाराजांच्या प्रतिमा पूजनाने कार्यक्रमाचा प्रारंभ करण्यात आला. प्रा. निलेश इंगळे यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेचा सविस्तर इतिहास मांडून बुद्धिमत्तेचा योग्य वापर केल्यास प्रत्येक क्षेत्रात भारत विकास साधू शकतो, असे सांगून आता कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर सगळ्यांनी शिकून घेणे कसे गरजेचे झाले आहे, हे उदाहरणासह पटवून दिले.

अध्यक्षीय समारोपप्रसंगी प्राचार्य डॉ. दुर्गेश रवदे म्हणाले, कृत्रिम बुद्धिमत्ता ही माहिती तंत्रज्ञान आणि शास्त्रविषयांवर अधिक प्रभाव टाकत आहे. पण अजून तरी कला, साहित्य, संस्कृती, सामाजिक शास्त्रे या विषयांवर तिला फारसा प्रभाव टाकता आला नाही. भावनिक बुद्धिमत्तेला पर्याय कृत्रिम बुद्धिमत्ता होऊ शकणार नाही. त्यामुळे सर्वांनी भावनिक बुद्धिमत्तेबरोबरच कृत्रिम बुद्धिमत्ता समजून घ्यावी, असे त्यांनी आवाहन केले.

प्रा. इंगळे यांनी श्रोत्यांनी विचारलेल्या विविध प्रश्नांची योग्य उकल करून श्रोत्यांचे समाधान केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ. हनुमंत भोपाळे यांनी केले, तर आभार सहसमन्वयक प्रा. ए.आर. अपस्तंभ यांनी मानले.

# बकरी ईदनिमित्त कायद्यानुसारच कुर्बानी देऊ; मात्र प्रशासनाने गोभक्तांना आवरण्याची मागणी

**नांदेड (प्रतिनिधी)** –येत्या दि.२७ मे रोजी बकरी ईद साजरी करण्यात येणार आहे. यानिमित्त शासनाच्या गोवंश हत्याबंदी कायद्याचे तंतोतंत पालन करण्यात येणार असून, कायद्यानुसारच कुर्बानी देण्यात येणार आहे. परंतु प्रशासनाने गो भक्तांकडून अनुचित प्रकार घडला जाऊन नये याविषयी प्रशासनाने खबरदारी घ्यावी, अशी मागणी कुल जमाते तहेरीकच्या वतीने पत्रकार परिषदेत करण्यात आली.

महाराष्ट्रात गोवंश हत्याबंदी कायदा लागू आहे. या कायद्यानुसार गोवंशाची हत्या करण्यात येत नाही. परंतु बकरी, बकरा, मेंढी, म्हैस, हेला आदी प्राण्यांची कुर्बानी देता येते. त्यामुळे या कायद्याचे पालन करुनच कुर्बानी करण्यात येणार आहे. परंतु मागील काही वर्षांचा अनुभव पाहता ऐन बकरी ईदच्या वेळी काही गो भक्त विनाकारण बकऱ्यांची वाहतूक देखील आडवून मारहाण करतात. यावेळी गुन्हे दाखल देखील झालेले आहेत. अशा घटना घडू नये यासाठी पोलीस, प्रशासनाने खबरदारी घ्यावी. याबाबतीत प्रशासनाकडे निवेदन देण्यात येणार असल्याचे कुल जमाते तहेरीकच्या वतीने पत्रकार परिषदेत सांगण्यात आले.

या पत्रकार परिषदेला धर्मगुरु मुफ्ती आयुब कासमी, ॲड. अब्दुल रहेमान सिद्दीकी, एमआयएमचे सय्यद मोईन, फेरोज लाला, शेर अली, वसिम सुलेमान, माजी उपमहापौर शमीम अब्दुल्ला, बाबुभाई खोकेवाले, अजीत कुरेशी, ॲड. शाहेद खान आदींची उपस्थिती होती.

# बारावी कॉमर्समध्ये स्वानंद भातलवंडेचे घवघवीत यश

**लोहा (प्रतिनिध)–** लोहाचे भूमिपुत्र स्वानंद मनोजकुमार भातलवंडे यांनी इयत्ता १२ वी च्या वाणिज्य शाखेत ६०० पैकी ५६७ गुण संपादन करीत यश मिळविले आहे. १२ वीमध्ये ९५ टक्के गुण घेणाऱ्या स्वानंदने सीए व्हायचे असल्याचा मनोदय व्यक्त केला.



लोह्याचे भूमिपुत्र व परभणी येथे माध्यमिक शिक्षण विभाग पे-युनिटमध्ये अधीक्षक असलेले मनोज भातलवंडे याचे चिरंजीव स्वानंदने कॉमर्स शाखेत ६०० पैकी ५६७ म्हणजे ९५ टक्के गुण मिळविले आहेत. अकाउंटमध्ये १०० तर बुक किपिंगमध्ये ९९ गुण आहेत. आपल्या यशाचे श्रेय आई-वडील, गुरुजण आणि आप्तेष्टांना दिले आहे.

# भूकेल्यांसाठी आधार : दिलीप ठाकूर यांच्या उपक्रमाला सुनील राणे यांची दाद

**नांदेड (प्रतिनिधी)** –समाजातील शेवटच्या घटकापर्यंत माणुसकी पोहोचविण्याचे काम म्हणजे खऱ्या अर्थाने राष्ट्रसेवा होय. धर्मभूषण ॲड. दिलीप ठाकूर यांनी वर्षभरात ९० उपक्रम राबवून समाजासमोर एक आदर्श उभा केला आहे. 'भाऊचा माणुसकीचा फ्रिज' हा केवळ उपक्रम नसून तो मानवतेचा जिवंत संदेश आहे. असे उपक्रम महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात राबविले गेले पाहिजेत, असे प्रतिपादन भाजपा प्रदेश सरचिटणीस आमदार सुनील राणे यांनी केले.



नांदेड जिल्ह्याच्या आढावा बैठकीनिमित्त सुनील राणे हे शहरात आले होते. प्रदेश उपाध्यक्ष ॲड. चैतन्यबापू देशमुख यांनी त्यांना ॲड. दिलीप ठाकूर यांच्या विविध सामाजिक कार्याची सविस्तर माहिती दिली. समाजासाठी सातत्याने झटणाऱ्या या कार्याची दखल घेत त्यांनी स्वतःहून 'भाऊचा माणुसकीचा फ्रिज' या उपक्रमाला भेट देण्याची इच्छा व्यक्त केली. रविवारी सकाळी महावीर चौक येथील पंचवटी हनुमान मंदिर परिसरात असलेल्या या फ्रिजला त्यांनी भेट दिली. यावेळी भाजपा महानगराध्यक्ष अमरनाथ राजूरकर उपस्थित होते. प्रारंभी ॲड. दिलीप ठाकूर यांनी शाल, मोत्यांची माळ व नॅपकिनचा पुष्पगुच्छ देऊन मान्यवरांचा सन्मान केला.

उपक्रमाची माहिती देताना दिलीप ठाकूर यांनी सांगितले की, मागील पाच वर्षांपासून हा फ्रिज अखंडित सुरू असून दररोज ४० ते १२० जेवणाचे डबे येथे ठेवले जातात. कोणतीही अट न ठेवता, कोणताही भेदभाव न करता गरजू नागरिक हे डबे विनामूल्य घेऊन जातात. शहरात कोणीही उपाशी राहू नये आणि अन्न वाया जाऊ नये, या उदात्त हेतूने कोरोना काळात या उपक्रमाची सुरुवात करण्यात आली. भूक ही सर्वात मोठी वेदना आहे आणि त्या वेदनेवर अन्न हेच औषध आहे, या भावनेतून हा फ्रिज उभा राहिला. दिवाळीच्या काळात सुमारे एक क्विंटल मिठाई येथे ठेवली जाते, ज्यामुळे अनेक गरजू कुटुंबांच्या घरात सणाचा आनंद पोहोचतो.

याशिवाय जे चालू वर्ष असेल तितक्या संख्येत हिवाळ्यात ब्लँकेट, पावसाळ्यात छत्र्या आणि उन्हाळ्यात चपला यांचे मोफत वाटप करून गरजूंच्या जीवनात आधार निर्माण केला जातो. मागील ७४ महिन्यांपासून प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी मानसिकदृष्ट्या आजारी व निराधार व्यक्तींचे केस कापणे, दाढी करणे, स्वच्छ स्नान घालणे आणि त्यांना नवीन कपडे देणे असा कायापालट उपक्रम सातत्याने राबविला जात आहे. तसेच वर्षातील ३६५ दिवस सुरू असलेल्या तीन प्रमुख उपक्रमांमध्ये भुकेल्यांसाठी 'भाऊचा माणुसकीचा फ्रिज', रुग्णांसाठी 'भाऊचा डबा' आणि एचआयव्ही रुग्णांसाठी शासकीय रुग्णालयात दररोज बिस्किटांचे वाटप करणारा 'क्षुधा शांती ' यांचा समावेश आहे. या उपक्रमांमुळे हजारो गरजूंना आधार मिळत असून समाजात मानवतेचा जिवंत संदेश पोहोचत आहे.

हे सर्व उपक्रम खा. अशोकराव चव्हाण, खा. डॉ. अजित गोपछडे, प्रदेश उपाध्यक्ष संजय कौडगे, ॲड. चैतन्य देशमुख, माजी पालकमंत्री डी. पी. सावंत, महानगराध्यक्ष अमर राजूरकर, जिल्हाध्यक्ष डॉ. संतुकराव हंबर्डे व ॲड. किशोर देशमुख, महापौर कविता मुळे, उपमहापौर दीपकसिंह रावत, स्थायी सभापती विरेंद्रसिंघ गाडीवाले, सभागृह नेते ॲड. महेश कनकदंडे तसेच लायन्स उपप्रांतपाल योगेश जायस्वाल यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत आहेत.

# ज्येष्ठ नागरिकांना एस.टी. बस प्रवासाठी एन.सी.एम.सी. स्मार्ट कार्डचे वाटप



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** ज्येष्ठ नागरीक विरंगुळा केंद्र हडको येथे नगरसेवक वैजनाथ देशमुख यांच्या हस्ते ज्येष्ठ नागरिकांना बस प्रवासासाठी स्मार्ट कार्डचे वाटप करण्यात आले. यावेळी जवळपास १५० जणांना हे कार्ड वाटप करण्यात आले.

सिडको-हडको व आजू-बाजूच्या परिसरातील नागरिकांना विरंगुळा केंद्र श्री बालाजी मंदिर देवस्थान हडको येथे एस.टी. महामंडळाने जाहीर केल्याप्रमाणे स्मार्ट कार्ड वाटप शिबीर विरंगुळा केंद्रामध्ये सुरु करण्यात आले होते. शिबिराचे उद्घाटन भाजपाचे नगरसेवक वैजनाथ देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी ज्येष्ठ नागरीक संघाचे माणिक देशमुख,जयवंत सोमवाड, भागिरथी बच्चेवार, सेवानिवृत्त पोलीस निरीक्षक बालाजी इंगेवाड, बालाजी मंदिर विश्वस्त अध्यक्ष अरुण दमकोंडवार, करणसिंग ठाकूर, निर्मला केदार यांच्यासह मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते.

CMYK

निरोगी आरोग्याचा कानमंत्र

# निरामय



# उन्हाळ्यात बाहेर जाण्यापूर्वी...

**प्रत्येकाला कडक ऊन आणि उष्णता टाळायची असते. म्हणून या दिवसांत कामाशिवाय घरी राहून हे टाळता येते, पण काही कामानिमित्त बाहेर जावे लागले तर कडक उन्हाचा आपल्याला सामना करावा लागतो. काही लोकं तीव्र सूर्यप्रकाशामुळे सनबर्नची तक्रार करतात, तर काही लोकांना लाल पुरळ येऊ लागतात. तसेच जर बाहेर जाणे खूप महत्वाचे असेल तर घरातून बाहेर पडताना काही आवश्यक वस्तू सोबत ठेवाव्यात. घरातून बाहेर पडताना कोणकोणत्या वस्तू सोबत ठेवाव्यात ते जाणून घ्या...**

उन्हाळ्यात घराबाहेर पडताना सहसा छत्री, हातमोजे आणि स्कार्फ वापरणे आवश्यक आहे, जेणेकरून कडक उन्हापासून चेहऱ्याचे संरक्षण करता येईल. यासोबतच घरातून बाहेर पडण्यापूर्वी चेहऱ्यावर चांगल्या दर्जाचे सनस्क्रीन क्रीम लावा, ज्यामुळे सूर्याच्या किरणांपासून संरक्षण होऊ शकते.

- भरपूर पाणी प्या : नितळ त्वचा मिळविण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे पाणी पिणे कारण पाण्यामुळे शरीरात आणि त्वचेचे हायड्रेशन वाढते. दिवसातून कमीत कमी ६ ते ७ लीटर पाणी पिणे आवश्यक आहे. तसेच त्वचा घट्ट आणि चमकदार होण्यास मदत होते. त्यामुळे त्वचेच्या पेशी चांगल्या प्रकारे काम करतात आणि टॉक्सिन्स बाहेर पडतात.
- हंगामी फळांचे सेवन करा : उन्हाळ्यात शरीराला अधिकाधिक पाण्याची गरज असते. अशा परिस्थितीत काकडी, टरबूज इत्यादींचे सेवन तुमच्यासाठी फायदेशीर ठरू शकते. खरं तर, काकडीत व्हिटॅमिन सी, व्हिटॅमिन के, कॉपर, मॅग्नेशियम, पोटॅशियम, मॅंगनीज आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे सिलिका यांसारखे आवश्यक पोषक घटक असतात. त्वचा आणि केसांसाठी हे खूप फायदेशीर मानले जाते.
- झोपण्यापूर्वी करा हे काम : यासोबतच दररोज उन्हातून आल्यानंतर संध्याकाळी झोपण्यापूर्वी त्वचेची चमक कायम ठेवण्यासाठी बेसन, हळद पावडरमध्ये दूध किंवा मलई मिसळून पेस्ट तयार करा. आता ही पेस्ट तुमच्या चेहऱ्यावर आणि मानेवर लावा आणि हलक्या हातांनी मसाज करा. १० मिनिटे चेहऱ्यावर राहू द्या, नंतर पाण्याने चेहरा धुवा. यामुळे तुमच्या चेहऱ्यावर चमक येईल आणि उन्हाळ्यात त्वचा चमकदार होईल.

# उन्हाळ्यात घरीच बनवा फेस सीरम!



उन्हाळ्याचा हंगाम सुरू आहे. या ऋतूत उन्हामुळे आणि मातीमुळे त्वचेचे खूप नुकसान होते. त्वचेवर मुरुम, पिंपल्स वगैरे होऊ लागतात. इतकंच नाही तर यामुळे त्वचाही निस्तेज दिसते, उन्हाळ्याच्या ऋतूत चेहऱ्याची विशेष काळजी घेणं गरजेचं असतं. चांगली आणि सुंदर त्वचा मिळवण्यासाठी टोनिंग, मॉइस्चरायझिंग करणे अत्यंत महत्वाचे आहे.

चेहऱ्यावर सीरम लावल्याने त्वचेशी संबंधित अनेक समस्या दूर होण्यास मदत मिळते. फेस सीरम आपल्या त्वचेला पोषण देणाऱ्या घटकांचा वापर करून तयार केले जाते. या घटकांमध्ये पोषक असतात जे आपली त्वचा निरोगी आणि सुंदर ठेवतात. बाजारात उपलब्ध असलेले अनेक फेस सीरम हानिकारक रसायनांनी तयार केले जातात. अशा परिस्थितीत, तुम्ही हे सिरम बाहेरून विकत घेण्यापेक्षा घरीच बनवू शकता. होममेड सीरम तुमच्या त्वचेला केवळ नैसर्गिक पोषणच देत नाही तर कोणत्याही ॲलर्जीशिवाय तुमची त्वचा चमकदार आणि निरोगी बनवेल.

## असे सीरम बनवा

घरी सीरम बनवण्यासाठी एका भांड्यात एक चमचा एलोवेरा जेल, अर्धा चमचा व्हिटॅमिन ई तेल आणि दोन थेंब लॅव्हेंडर तेल मिसळा आणि एका स्वच्छ डब्यात भरा. आता हे सीरम त्वचेला मॉइश्चरायझिंग करण्यास मदत करेल. सिरमच्या रोजच्या वापराने तुम्हाला तुमच्या त्वचेत सकारात्मक बदल दिसतील.

## सीरमचे फायदे

सीरम चेहऱ्यावर लावल्याने त्वचा हायड्रेट राहते आणि चेहऱ्यावरील तेलकटपणा कमी होतो. याशिवाय यामध्ये असलेले व्हिटॅमिन सी चेहऱ्यावरील उघडे छिद्र कमी करते आणि वृद्धत्वाची लक्षणे कमी करते. सीरम त्वचेवरील डाग कमी करण्यासही मदत करते. सीरमच्या मदतीने तुम्ही तुमची त्वचा उजळ करू शकता. सीरम हे त्वचेच्या आरोग्यासाठी खूप फायदेशीर मानले जाते.

## या गोष्टी लक्षात ठेवा...

जेव्हा तुम्ही घरी सीरम बनवता तेव्हा लक्षात ठेवा की सीरममध्ये वापरलेले सर्व घटक ताजे असावेत. याशिवाय, सीरम हवाबंद आणि स्वच्छ कंटेनरमध्ये ठेवा, सीरम चेहऱ्यावर घासू नका आणि हलक्या हाताने लावा. सीरम लावण्यापूर्वी त्याचा एक पॅच टेस्ट करा. सीरम वापरण्यापूर्वी चेहरा पूर्णपणे स्वच्छ करा, सीरम रात्री वापरणे चांगले होईल. काही लोकांना सीरमची ॲलर्जी असू शकते, जर असे होत असेल तर नक्कीच डॉक्टरांचा सल्ला घ्या.

# दुधाची 2 चमचे साय निस्तेज चेहऱ्यावर करेल जादू

**वाढत्या वयाचा, वाढत्या उन्हाचा तुमच्या आरोग्यावर विपरित परिणाम होऊ लागतो. एवढ्या कडाक्याच्या उन्हात प्रत्येकाने स्वतःच आरोग्य नीट ठेवण्यासाठी हेल्थ टिप्स फॉलो केल्या पाहिजेत. सोबतच चेहऱ्याचीही काळजी घेणे गरजेचे आहे. सुंदर दिसणे सर्वांनाच आवडते. यासाठी लोक अनेक प्रयत्नही करतात. तुम्हालाही चमकदार त्वचा मिळवायची असेल तर ही बातमी तुमच्यासाठी आहे. तुम्ही घरच्या घरी दुधाची साय किंवा मलई लावू शकता. कोरड्या त्वचेसाठी दुधाची साय खूप फायदेशीर आहे. चला तर जाणून घेऊया त्वचेवर दुधाची साय कशी लावायची.**

## उपयोग जाणून घ्या...

दुधाची साय त्वचेला हायड्रेट ठेवण्यासाठी देखील खूप मदत करते. यात लॅक्टिक ॲसिड असते. जे पिंपल्स आणि बॅक्टेरिया नष्ट करण्यास मदत करते. चेहऱ्यावर मलई लावण्यापूर्वी तुम्ही तुमचा चेहरा पूर्णपणे धुवा आणि स्वच्छ करा. नंतर हलक्या हातांनी चेहऱ्यावर थोडीशी मलई लावा. यानंतर, हलक्या हाताने मसाज करा आणि २० मिनिटे राहुद्यात. त्यानंतर कोमट पाण्याने चेहरा धुवा. हे आठवड्यातून एक किंवा दोनदा करा. जेणेकरून तुमची त्वचा गोरी आणि चमकदार राहील. याशिवाय तुम्ही याचा वापर फेस मास्क, क्लिन्जर किंवा मॉइश्चरायझर म्हणूनही वापर करू शकता.

## फेस मास्क

फेस मास्कसाठी, तुम्हाला एक चमचा मलई घ्या. नंतर त्यात थोडे मध घाला आणि चेहऱ्यावर लावा. त्यानंतर २० मिनिटे ठेवा आणि कोमट पाण्याने धुवा. क्लींजर बनवण्यासाठी तुम्हाला एक चमचा बेसन आणि एक चमचा मलई मिसळावी लागेल. नंतर हे मिश्रण चेहऱ्यावर लावून हळूहळू मसाज करा आणि नंतर कोमट पाण्याने धुवा. प्रत्येकाची त्वचा वेगळी असते. म्हणूनच क्रीम काही लोकांना सूट करते आणि इतरांना नाही, जर तुम्हाला त्याची ॲलर्जी असेल तर नक्कीच डॉक्टरांचा सल्ला घ्या.



# उन्हाळ्यात चेहरा कायम चिपचिपा, घामट दिसतो?

**उन्हाचा तडाखा दिवसेंदिवस वाढत चालला आहे. वाढत्या उन्हात त्वचेची काळजी घेणं अत्यंत गरजेचं आहे. उन्हामुळे त्वचेशी संबंधित विविध समस्या निर्माण होतात. खास करून नाजूक त्वचा असलेल्यांसाठी उन्हाळा खूपच त्रासदायक असतो. अनेकांचा चेहरा उन्हाने लाल होतो. अनेकदा सनबर्न किंवा ॲलर्जीमुळे देखील हा लालपणा येतो. पण आता तुम्हाला काळजी करण्याची गरज नाही, आज आम्ही तुम्हाला दोन उपायांबद्दल सांगणार आहोत ज्याचा वापर करून तुम्ही तुमचा चेहरा मुलायम आणि चमकदार बनवू शकता. चला त्या गोष्टींबद्दल जाणून घेऊया...**

प्रत्येकाला तरुण आणि सुंदर दिसायचे असते. यासाठी लोक खूप प्रयत्न करतात. मात्र अनेक प्रयत्न करूनही लोकांच्या चेहऱ्यावरील पिंपल्स आणि डाग दूर होत नाहीत. अनेक वेळा हा चिंतेचा विषय बनतो. जर तुम्हालाही चेहऱ्यावरील डागांमुळे त्रास होत असेल तर या दोन गोष्टींचा अवश्य वापर करा. नारळ तेल आणि कोरफड. नारळाच्या तेलात मॉइश्चरायझिंग आणि अँटिऑक्सिडंट गुणधर्म असतात, जे त्वचेला हायड्रेट आणि निरोगी ठेवण्यास मदत करतात. एलोवेरा जेल त्वचेसाठी खूप फायदेशीर मानले जाते. यात दाहक-विरोधी गुणधर्म आहेत, जे त्वचेला थंड ठेवण्यास मदत करतात.

- फेस मास्कचा वापर : तुम्ही खोबरेल तेल आणि कोरफड वेरा जेलने फेस मास्क बनवू शकता, यासाठी तुम्हाला एक चमचा खोबरेल तेल आणि एक चमचा एलोवेरा जेल चांगले मिक्स करावे लागेल, त्यानंतर ही पेस्ट तुमच्या चेहऱ्यावर आणि मानेवर लावा. २० मिनिटांनंतर कोमट पाण्याने धुवा.
- फेसक्रीम : तुम्ही यापासून क्रीमही बनवू शकता. यासाठी एका भांड्यात खोबरेल तेल गरम करून त्यात एलोवेरा जेल टाका आणि मंद आचेवर २० मिनिटे शिजवा, जेव्हा कोरफड काळी पडू लागते तेव्हा गॅस बंद करा आणि थंड होऊ द्या. ते थंड झाल्यावर तुम्ही चेहऱ्यावर लावू शकता. काही लोकांना खोबरेल तेल किंवा कोरफडीची ऍलर्जी असू शकते, त्यामुळे फेस मास्क वापरताना चेहऱ्यावर जळजळ किंवा लाल पुरळ उठत असेल तर नक्कीच डॉक्टरांचा सल्ला घ्या.

# उन्हाळ्यात भरपूर पाणी प्यावं, पण नेमकं किती?



**पाणी म्हणजेच ज्याला आपण जल असे म्हणतो. या पृथ्वीवरील सर्व पशू-पक्ष्यांचे आणि माणसाचे जीवन हे पाण्यावरच अवलंबून आहे. त्यामुळे पाण्याला जीवन असे सुद्धा म्हणतात. आपले शरीर हे ६५ ते ७० टक्के पाण्याने भरलेले आहे. शरीरातील प्रत्येक अवयवाला कार्य करण्यासाठी पाण्याची आवश्यकता असते. आपल्या शरीरातील अवयवांची अंतर्गत कार्यप्रणाली व्यवस्थित चालू राहण्यासाठी पाणी खूप महत्त्वाचे असते. पाण्या अभावी या कार्य प्रणालीत बिघाड होऊ शकतो. त्यामुळे दिवसभरात जास्तीत जास्त पाणी पिणे आवश्यक आहे. मात्र, तुम्हाला माहिती आहे का, तुम्ही दिवसाला किती प्रमाणात पाणी प्यावे, हे तुमच्या वजनावर अवलंबून असते. शरीराच्या वजनानुसार पाण्याची गरज जाणून घेण्याची एक पद्धत आहे आणि हे जाणून घेणं खूप सोपं आहे...**

## कोणी किती पाणी प्यावे?

भरपूर पाणी प्यावे, असे आपण नेहमी ऐकतो. पण भरपूर म्हणजे नेमकं किती पाणी प्यावे, ते कळत नाही. भरपूर पाणी पिण्याच्या नादात आपण जास्तीचे पाणी पिऊन बसतो. जे आरोग्यास चांगले नसते. तसेच बरेच लोक एकाच वेळी दोन दोन ग्लास पाणी पितात. यामुळे ही शरीराला त्रास होऊ शकतो. त्यामुळे आपले वय आणि वजन किती आहे, याचा विचार करून मग त्या हिशोबाने पाणी पिले पाहिजे. प्रत्येकाच्या वयानुसार पाण्याची गरज वेगवेगळी असते. १५ वर्षे वयापर्यंतच्या मुलांनी साधारणपणे एक ते दोन लिटर पाणी पिले पाहिजे. प्रौढ व्यक्तींनी तीन ते चार लिटर पाणी रोज प्यावे. ज्यांचे वय ६० वर्षे पेक्षा जास्त आहे, अशा व्यक्तींनी तीन लिटरपर्यंत पाणी प्यावे. २५ किलो वजनाच्या व्यक्तीने चार ते पाच ग्लास पाणी पिणे आवश्यक असते. त्याचप्रमाणे ५० किलो वजनाच्या व्यक्तीने दिवसातून आठ ग्लास पाणी पिणे आवश्यक आहे. मेहनतीचे काम करणाऱ्यांनी व गरोदर स्त्रियांनी यापेक्षा थोडे म्हणजे एक दोन ग्लास जास्त पाणी पिल्यास चालते.

## पाणी पिण्याचे सूत्र

प्रथम तुमचे वजन मोजा. एकदा शरीराचं वजन (किलोग्रॅममध्ये) तपासलं गेल्यानंतर त्या संख्येला ३० ने भागायचं. येणारी संख्या ही रोज किती लिटर पाणी प्यायला हवं याची गणना आहे. म्हणजेच, या सूत्रानुसार, आपल्याला समजेल की, शरीराच्या वजनानुसार आपण दररोज किती लिटर पाणी प्यावं. समजा वजन ६० किलो असेल तर ते ३० ने भागाकार केल्यास २ ही संख्या मिळेल. म्हणजेच, ६० किलो वजनाच्या व्यक्तीने दररोज २ लिटर पाणी प्यावं. जर वजन ५० किलो असेल तर १.६ लिटर (१ लिटर आणि ६०० मिली) पाणी प्या. आरोग्य तज्ज्ञांच्या मते, जर तुम्ही योग्य प्रमाणात पाणी प्यायले तर ते वजन कमी करण्यातही मदत करेल. पाण्यात कॅलरीज नसतात. म्हणजेच जितके जास्त पाणी प्याल तितके वजन कमी होईल आणि शरीर हायड्रेटेड राहील.

## पाणी पिण्याची योग्य पद्धत काय आहे ?

पाणी नुसते पिऊन उपयोग नसतो, ते योग्य पद्धतीने प्यायले पाहिजे. पाणी पिताना नेहमी एका जागी बसून प्यावे. उभे राहून, चालताना किंवा गटागट पाणी पिऊ नये. हळूहळू एक एक घोट पाणी प्यावे. तसेच जर तुम्ही खूप तहानलेले असाल तर एकदम पाणी न पिता, एक ग्लास आत्ता व दुसरा ग्लास एक तासाने प्यावे. पाणी काही ठराविक वेळी पिल्यास त्याचे शरीराला चांगले फायदे मिळतात. जसे की सकाळी उठल्यावर लगेच ब्रश न करता एक ते दोन ग्लास पाणी प्यावे. यामुळे शरीर हायड्रेट होते व पित्ताचा त्रास होत नाही. त्यानंतर जेवणाआधी व जेवणानंतर एक ग्लास पाणी प्यावे. डोके दुखत असेल तर पाणी प्या. पाणी किती महत्वाचे आहे ते आपल्या सर्वांना समजले असेलच. त्यामुळे दररोज भरपूर पाणी प्या व निरोगी आयुष्य जगा.

# चेहरा धुवून स्वच्छ करताना...

**भारतामध्ये प्रखर उन्हाळा असतो. गेल्या काही वर्षांमध्ये उष्णतेचे प्रमाण वाढत असल्याचे चित्र आपल्यासमोर आहे. मागील एक-दोन आठवड्यांपासून दुपारी उन्हाच्या कडक झळा बसायला सुरुवात झाली आहे. या काळामध्ये शरीरात पाण्याची कमतरता भासायला लागते. परिणामी डिहायड्रेशनसारख्या गोष्टींचा त्रास व्हायला लागतो. उन्हाळ्यामध्ये त्वचेचे देखील नुकसान होते. कोरडी त्वचा, पिंपल्स, सनबर्न अशा समस्या उद्भवतात. अशा वेळी स्कीन केअर रुटीन फॉलो करणे आवश्यक असते.**

त्वचारोग तज्ज्ञ डॉ. गीतिका मित्तल-गुप्ता यांनी चेहऱ्याची निगा राखण्यासाठी दिवसातून दोन वेळा चेहरा धुण्याची सवय लावून घ्यायला हवी, असे सांगितले. रात्री झोपल्यावर चेहऱ्यावर तेल जमा होते. तेव्हा चेहरा साफ करणे आवश्यक असते. दिवसभर घाम, धूळ, प्रदूषण यांच्याचा थर चेहऱ्यावर येऊ शकतो. तेव्हा रात्री झोपण्यापूर्वी चेहरा धुतल्याने तो थर निघून जातो. रात्री चेहरा धुण्याआधी मेकअप देखील काढून टाकावा. या सोप्या सवयींचा समावेश स्कीन केअर रुटीनमध्ये केल्याने खूप फायदा होऊ शकतो, असे तज्ज्ञ सांगतात.



## फॉलो करायच्या टिप्स...

- चेहरा स्वच्छ करताना नेहमी कोमट पाण्याचा वापर करावा.
- बोटांच्या सहाय्याने क्लिंझर हळूवारपणे चेहऱ्याला लावा.
- सकाळी एकदा आणि रात्री एकदा चेहरा धुवायला विसरू नका.
- घाण निघून जाण्यासाठी चेहरा किमान ६० सेकंदांसाठी धुणे आवश्यक असते.
- चेहरा धुतल्यानंतर मऊ टॉवेलने चेहरा हळूहळू पुसावा.
- सौम्य, पीएच लेव्हल संतुलित असलेल्या आणि स्कीन टाइपला योग्य असणाऱ्या क्लिंझरचा वापर करावा.
- नियमितपणे योग्य प्रमाणात टोनर, सीरम, मॉइश्चरायझर, रेटिनॉल आणि सनस्क्रीन वापरा.
- चेहऱ्याची त्वचा ही खूप संवेदनशील आणि नाजूक असते. त्याच्यावर कोणत्याही गोष्टीचा लगेच परिणाम होऊ शकतो. त्यामुळे चेहऱ्याची निगा राखणे आवश्यक असते. उन्हाळ्यामध्ये यावर अधिक लक्ष देणे गरजेचे असते.

# नांदेड शहराला उन्हाळ्यात पाणी टंचाई भासणार नाही याविषयी नियोजन करा; महापौरांचे पाणीपुरवठा विभागाला सक्त सूचना



**नांदेड (प्रतिनिधी)** –उन्हाळ्याची तीव्रता वाढत असून, शहरातील नागरिकांना पाणी टंचाईचा सामना करावा लागू नये, यासाठी महापौर कविता मुळे यांनी मंगळवार, दि. ५ मे रोजी महापालिकेच्या मुख्यालयात पाणीपुरवठा विभागाचा सविस्तर आढावा घेतला. शहरातील जलसाठा मुबलक असला तरी वितरणातील त्रुटी दूर करून शेवटच्या टोकापर्यंत पाणी पोहोचवण्याचे निर्देश त्यांनी प्रशासनाला दिले आहेत.

या बैठकीस पालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, उपमहापौर दीपकसिंह रावत, स्थायी समिती सभापती विरेंद्रसिंघ गाडीवाले, सभागृह नेता ॲड. महेश कनकदंडे, गटनेता संदीपसिंघ गाडीवाले, माजी सभापती किशोर स्वामी, माजी महापौर जयश्री पावडे, नगरसेवक अभिषेक सौदे, आशिष नेरलकर, तुलजाराम यादव, दिलीप कंदकुर्ते, नगरसेवक प्रतिनिधी निलेश पावडे, संतोष मुळे, किशोर भवरे, बजरंगसिंह ठाकूर, नागनाथ गड्डम, शहर अभियंता सुमंत पाटील, कार्यकारी अभियंता संघरत्न सोनसळे व पाणी पुरवठा विभागाचे इतर कर्मचारी उपस्थित होते.

बैठकीच्या प्रारंभी पाणी पुरवठा विभागामार्फत पाणी पुरवठ्याची सद्यस्थिती व आगामी काळात अमृत २.० योजनेअंतर्गत होणाऱ्या कामांची माहिती देणारे सादरीकरण करण्यात आले. तद्नंतर विष्णुपुरी धरणात सध्या पुरेसा पाणीसाठा उपलब्ध असून शहरासाठी पाणी कपातीची आवश्यकता नसल्याचे महापौरांनी स्पष्ट केले. दुरुस्ती कामांना प्राधान्य देऊन जलवाहिन्यांमधील गळती त्वरित शोधून त्या दुरुस्त कराव्यात, जेणेकरून पाण्याचा अपव्यय टाळता येईल. कौठा भागासह शहरातील विविध भागांत प्रायोगिक तत्त्वावर बसवण्यात आलेल्या मीटर यंत्रणेचा आढावा घेण्यात यावा. ज्या ठिकाणी तांत्रिक बिघाडामुळे पाणी पुरवठा खंडित झाला आहे, तिथे तज्ज्ञ कर्मचाऱ्यांमार्फत तातडीने दुरुस्ती करण्याचे आदेश दिले. पाणी उपसा केंद्र व जलशुध्दीकरण केंद्रावर वीज खंडित झाल्यामुळे पाणीपुरवठा विस्कळीत होऊ नये, यासाठी महावितरणसोबत समन्वय ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या. त्याच–प्रमाणे मुख्य शहराव्यतिरिक्त नवीन वसाहती आणि नगरांमध्ये जेथे पाणी कमी दाबाने येते, तेथील समस्या तातडीने दूर करून सुरळीत पुरवठा करण्याचे नियोजन करण्यास सांगितले.

नांदेडकरांना स्वच्छ आणि पुरेसे पाणी मिळणे हा त्यांचा हक्क आहे. प्रशासनाने तक्रार निवारण यंत्रणा २४ तास सक्रिय ठेवावी. कोणत्याही प्रभागात पाणी टंचाईची तक्रार आल्यास संबंधित अधिकाऱ्याला जबाबदार धरले जाईल, असा इशारा महापौरांनी दिला. तसेच नागरिकांनी पाण्याचा वापर काटकसरीने करावा आणि पिण्याचे पाणी बागेसाठी किंवा गाड्या धुण्यासाठी वापरू नये, असे आवाहनही महापौर कविता मुळे यांनी केले.

# खा. अशोकराव चव्हाण व आ. श्रीजया चव्हाण यांनी जिल्हा परिषदेत घेतली आढावा बैठक




**नांदेड (प्रतिनिधी)** – माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण आणि भोकर विधानसभा मतदारसंघाच्या आ. श्रीजया चव्हाण यांनी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली व इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक घेऊन विविध विकासकामांचा सविस्तर आढावा घेतला. या बैठकीत जिल्हा परिषदेच्या माध्यमातून राबवल्या जाणाऱ्या केंद्र व राज्य सरकारच्या विविध लोककल्याणकारी योजनांच्या अंमलबजावणीची समीक्षा करण्यात आली.

यामध्ये प्रामुख्याने जलजीवन मिशन, वॉटर ग्रीड योजना, रस्ते विकास, पाणंद रस्ते, शिक्षण व सार्वजनिक आरोग्य सुविधा आणि रोजगार हमी योजनेच्या कामांचा समावेश होता. खा. अशोकराव चव्हाण व आ. श्रीजया चव्हाण यांनी संबंधित कामांच्या प्रगतीची सद्यस्थिती आणि त्यातील अडचणींची विस्तृत माहिती जाणून घेतली. तसेच सर्व प्रलंबित विकासकामे विहित मुदतीत आणि वेगाने पूर्ण करण्यासंदर्भात प्रशासकीय अधिकाऱ्यांना आवश्यक सूचनाही त्यांनी दिल्या.

या आढावा बैठकीला अर्धापूरचे भाजपा तालुकाध्यक्ष बालाजी गव्हाणे, भोकरचे तालुकाध्यक्ष दिवाकर रेड्डी, मुदखेडचे तालुकाध्यक्ष दत्तू देशमुख वाडीकर यांसह जिल्हा परिषदेच्या विविध विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

# भाजपाच्या विजयाचा भोकरमध्ये जल्लोष; फटाक्यांची आतीषबाजी आणि पेढे वाटून साजरा केला आनंदोत्सव



**भोकर(प्रतिनिधी)** –पश्चिम बंगाल, आसाम आणि पुद्दूचेरी या राज्यांच्या विधानसभा निवडणुकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पार्टीने मिळवलेल्या घवघवीत यशाचे पडसाद भोकरमध्ये उमटले आहेत. या ऐतिहासिक विजयाचा आनंद साजरा करण्यासाठी मंगळवारी भोकरमध्ये भाजपाच्या वतीने फटाक्यांच्या आतीषबाजीत आणि पेढे वाटून मोठा जल्लोष करण्यात आला.

संपूर्ण देशाचे लक्ष लागून असलेल्या या राज्यांमध्ये भाजपाने आपले वर्चस्व सिद्ध केल्याने कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण होते. भोकर शहर व ग्रामीण मंडळातील प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात एकत्र येऊन 'भारतीय जनता पार्टीचा विजय असो', 'चप्पा चप्पा भाजपा' अशा घोषणांनी परिसर दणाणून सोडला.

या विजयोत्सवा प्रसंगी सभापती जगदीश पाटील भोसीकर, नगराध्यक्ष भगवानराव दंडवे, उपनगराध्यक्ष दिलीप सोनवाडे, संचालक रामचंद्र मुसळे, गटनेते विठ्ठल पाटील धोंडगे, हरीभाऊ चटलावार, गणपत पिटेवाड, आत्रीक पाटील मुंगल, नगरसेवक योगेश भोकरकर, गणेश यशवंतकर, नगरसेविका वनश्री लक्षटवार, सुनिता राचुटकर, डॉ. मनोज गिमकर, सारंग मुंदडा, सुनिल शहा, सुवेश पोकलवार, गौतम कसबे, सिद्देश्वर पिटलेवाड, अविनाश वाघमारे, वेणू कोंडलवार, मोहन राठोड, सुहास पवार, विजय पवार, लक्ष्मण पुपलवाड, ऋषिकेश स्वामी, धनराज मोघाळीकर, योगेश इज्जतगावकर, वैजनाथ क्षीरसागर, बालाजी वाघमारे यांच्यासह शहर व ग्रामीण भागातील असंख्य कार्यकर्ते, नगरसेवक आणि बाजार समितीचे संचालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अवैध रेती साठवून ठेवणाऱ्या ३ जणांविरुद्ध गुन्हा दाखल; ४७ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त



**नवीन नांदेड(प्रतिनिधी)**– ऑपरेशन क्रॅक डाऊन अंतर्गत गोदावरी नदी पात्रातील अवैध रेती उपसा करून साठवून ठेवणाऱ्या रेती माफियांवर नांदेड ग्रामीण पोलिसांनी छापा कारवाई करून एकूण ४७ लाख २५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या कारवाईत तीन जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

नांदेडचे पोलीस अधीक्षक अविनाश कुमार यांनी ऑपरेशन क्रॅक डाऊन अंतर्गत अवैधरित्या गौण खनिज (रेती) उपसा व वाहतूक करणारे लोकांवर कारवाई करणे बाबत सर्व पो.स्टे. प्रभारी अधिकारी यांना आदेशित केले आहे. त्या अनुषंगाने नांदेड ग्रामीणचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या आदेशान्वये सोमवार, दि. ४ मे रोजी पोलीस अधिकारी व अंमलदार पो. स्टे. हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना सायंकाळी ६ वाजता गोपनीय माहिती मिळाली की, पिंपळगाव निमजी शिवारातील गोदावरी नदीपात्राचे किनाऱ्यावर काही इसम नदीतून अवैध रेती उपसा करून साठवून ठेवत आहेत. या महितीवरून पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर, पोउपनि बाबुराव चव्हाण, पोकॉ. शेख जमीर, पोकॉ. कदम, पो.स्टे. नांदेड ग्रामीण अधिकारी व अंमलदार यांनी दोन पंचांना सोबत घेऊन मिळालेल्या माहितीच्या ठिकाणी ६.३० वाजताचे सुमारास छापा मारला असता वरील आरोपी तराफे व इंजीन साठवून ठेवलेल्या रेतीसह मिळून आले.

या नदीपात्रात असलेला वरील मुद्देमाल नदीपात्रातून आणणे शक्य नसल्याने तो जागीच तोडून जाळून नाश केला व नदी काठी उपसा करून साठवून ठेवलेली ५ ब्रास रेती दोन पंचांसमक्ष पोउपनि बाबुराव चव्हाण यांनी जप्ती पंचनामा करून दुसऱ्या वाहनात टाकून पो.स्टे. ला जमा केली. तसेच तीन आरोपीतां–विरुद्ध कलम ३०३(२) ३(५) भा. न्या. सं, सहकलम ४८ (७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम व पर्यावरण संरक्षण अधिनियम कलम ९ व १५ व सार्वजनिक संपत्ती नुकसान अधिनियम कलम ३,७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी केलेल्या कामगिरीविषयी नांदेडचे पोलीस अधीक्षक अविनाश कुमार यांनी कौतुक केले आहे.

# जिल्ह्यात पाणी टंचाई निवारणासाठी ५१.५८ कोटींचा कृती आराखडा

## पाणी टंचाई निवारणासाठी प्रशासन सज्ज

**नांदेड (प्रतिनिधी)**– जिल्ह्यातील संभाव्य पाणी टंचाई लक्षात घेऊन सन २०२५–२६ या कालावधीसाठी व्यापक कृती आराखडा शासनाकडे सादर करण्यात आला असून, जानेवारी ते मार्च २०२६ आणि एप्रिल ते जून २०२६ या कालावधीसाठी एकूण सुमारे ५१.५८ कोटी रुपयांचा आराखडा तयार करण्यात आला आहे.

जिल्ह्यात पाणी टंचाई उद्‌भवू नये यासाठी जिल्हा प्रशासनाच्या वतीने आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येत आहेत.

जिल्हास्तरावर पालकमंत्री अतुल सावे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत ग्रामीण व शहरी भागासाठी पिण्याच्या पाण्याचे आरक्षण निश्चित करण्यात आले. त्यानुसार ग्रामीण भागासाठी २४.१७ दलघमी, नांदेड महानगरपालिका क्षेत्रासाठी ४९.०४ दलघमी, तर नगर परिषद क्षेत्रासाठी २६.७६१ दलघमी असे एकूण ९९.९७१ दलघमी पाणी विविध धरणे व जलाशयांमध्ये आरक्षित करण्यात आले आहे. पाणी टंचाई निवारणासाठी विविध उपाययोजनांनाही प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. यामध्ये २७१ नळयोजना विशेष दुरुस्ती, १०४ तात्पुरत्या पुरक नळयोजना, ५३४ नवीन विंधन विहिरी, तसेच १३ विहिरींचे खोलीकरण व गाळ काढण्याच्या कामांचा समावेश आहे. अशा एकूण ९२२ उपाययोजना मंजूर करण्यात आल्या आहेत.

दरम्यान, ४ मे २०२६ पर्यंत जिल्ह्यातील गावे, वाड्या व तांड्यांना ५८ विहीर/बोअरवेल अधिग्रहणाद्वारे पाणीपुरवठा सुरू असून, सध्या एकही टँकर सुरू करण्यात आलेला नाही.प्रशासनाकडून पाणी टंचाई टाळण्यासाठी नियोजनबद्ध उपाय–योजना राबवण्यात येत असून, नागरिकांना नियमित व पुरेसा पाणीपुरवठा सुनिश्चित करण्यावर भर दिला जात आहे.

# विवाहितेला आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी एका विरुद्ध गुन्हा

**अर्धापूर (प्रतिनिधी)**– अर्धापूर तालुक्यातील लोणी येथील एका विवाहित महिलेस तू मला खूप आवडतेस, तू माझ्यासोबत आली नाहीस तर मी तुझा संसार मोडतो, अशी धमकी देऊन वेळोवेळी त्रास दिला. यामुळे महिलेची सासरी व माहेरी बदनामी झाली असल्याने सदर विवाहित महिलेने या त्रासाला कंटाळून सोमवार, दि. ४ मे रोजी रात्री उशिरा राजेश लोणे यांच्या विहिरीत उडी मारून आत्महत्या केली.

मयत विवाहित महिलेच्या वडिलाने दिलेल्या फिर्यादीवरून आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी आरोपी प्रफुल्ल सुनील लोणे रा. लोणी याच्याविरुद्ध अर्धापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक चंद्रशेखर कदम यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सुरेश भोसले हे करीत आहेत.

**झाडे लावा, झाडे जगवा**

# किनवट शहरात वीज पुरवठा खंडित; आंदोलनाचा इशारा

**किनवट (प्रतिनिधी)** –किनवट शहरात गेल्या महिनाभरापासून दिवसभरात अधून–मधून वीज पुरवठा खंडित होण्याचे प्रमाण वाढले आहे. या प्रकारामुळे रणरणत्या उन्हात पाणी पुरवठ्यासह उद्योग धंद्यांवर विपरीत परिणाम होत आहे. किनवट शहरातील वीज पुरवठा त्वरित सुरळीत करा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा भाजपचे माजी जिल्हा उपाध्यक्ष तथा माजी उपनगराध्यक्ष श्रीनिवास नेम्मानीवार यांनी एका निवेदनाद्वारे दिला आहे.

या संदर्भात महावितरण कंपनीच्या अभियंत्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, मागील महिनाभरापासून किनवट शहरात दिवसभरात अनेक वेळा वीज पुरवठा खंडित होत असल्याने दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे. वीज पुरवठ्याअभावी विजेवर चालणारी उपकरणे बंद पडत असल्याने टेलर, फोटोकॉपी सेंटर, वेल्डिंग वर्कशॉप यांसारख्या हातावर पोट असलेल्या व्यावसायिकांचे मोठे नुकसान होत आहे. महावितरणची उपकरणे कालबाह्य आणि जीर्ण झाल्यामुळे भार सहन न होऊन उपकरणांत वारंवार बिघाड होत आहेत, अशी अनेकांची तक्रार आहे.



अलीकडेच एसव्हीएम परिसर, मोमीनपुरा आणि भाजी मार्केट येथील विद्युत रोहित्रांनी पेट घेतल्याच्या घटना घडल्या आहेत, ज्यामुळे मोठ्या दुर्घटनेची भीती निर्माण झाली आहे. महावितरणने शहरातील वीज पुरवठा त्वरित सुरळीत करावा. जर ही परिस्थिती सुधारली नाही, तर जनआंदोलन छेडले जाईल, असा इशारा श्रीनिवास नेम्मानीवार यांनी दिला आहे. जीर्ण झालेले ट्रान्सफॉर्मर आणि तारा तातडीने बदलणे आवश्यक आहे. पावसाळाच्या पार्श्वभूमीवर आवश्यक ती मान्सूनपूर्व कामे तातडीने पूर्ण करणे,याबाबत त्यांनी महावितरणच्या अभियंत्यांशी चर्चा केली. नागरिकांच्या मागणीची दखल घेतली नाही तर लवकरच आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

## नांदा सौख्यभरे

### कोकाटे–पाटील

**नांदेड** –येथील सांगवीतील रहिवासी अनिलराव कोकाटे यांची तृतीय कन्या चि. सौ. कां. शीतल यांचा शुभविवाह उदगीर येथील रहिवासी विश्वनाथराव पाटील यांचे ज्येष्ठ सुपुत्र चि. अभिषेक यांजसमवेत वामनराव पावडे मंगल कार्यालय येथे बुधवार, दि. ६ मे २०२६ रोजी दुपारी १२.३५ वाजता संपन्न होणार आहे.

### कदम–घाटोळ

लोहा तालुक्यातील सेलगाव येथील रहिवासी कै. रवीकुमार कदम यांची ज्येष्ठ कन्या चि. सौ. कां. ऋतुजा यांचा शुभविवाह लोहा तालुक्यातील बोरगाव (कोल्हा) येथील रहिवासी केशवराव घाटोळ यांचे ज्येष्ठ सुपुत्र चि. विकास यांजसमवेत आज बुधवार, दि. ६ मे २०२६ रोजी दुपारी १२.२३ वाजता गोकुळ लॉन्स मंगल कार्यालय नांदेड येथे संपन्न होत आहे. वधू–वरांस हार्दिक शुभेच्छा!

**–मुख्यसंपादक**

# प्रा. श्याम मानव यांच्या व्याख्यानास नांदेडमध्ये प्रतिसाद



**नांदेड (प्रतिनिधी)** –अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापक संघटक प्रा. श्याम मानव यांच्या व्याख्यानाचे आयोजन अंनिस व समविचारी पक्षांच्या वतीने नांदेड येथील कै. शंकरराव चव्हाण प्रेक्षागृहात ४ मे रोजी सायंकाळी ६:३० वाजता करण्यात आले होते. या व्याख्यानाला नागरिकांना प्रतिसाद दिला.

भोंदू बाबा अशोक खरात याच्या सह देशातील अनेक बाबांच्या फसवणूक व महिला शोषण झालेल्या सत्य कथा त्यांनी पुराव्यानीशी आपल्या व्याख्यानात मांडल्या

महिला बाबाच्या नादी का लागतात व कशा फसतात?, बुआ आणि ज्योतिषी महिलांना कसे फसवतात? कोणती प्रलोभने दिली जातात? शारीरिक व आर्थिक शोषण कसे होते? ढोंगी बाबांना ओळखायचे कसे? जादूटोणा विरोधी कायद्यात बाबांवर कारवाई होऊ शकते काय? आदी विषयांवर प्रत्यक्ष भंडाफोड व विविध प्रकरणाचा ऊहापोह प्रा. मानव यांनी केला. व्याख्यान ऐकण्यासाठी हजारोंची गर्दी झाली होती.

उद्‌घाटन अेनिसच्या कार्यकर्त्या सुलोचना मुखेडकर यांनी केले तर माकपचे राज्य समितीचे कॉ. विजय गाभने यांनीही सभेला संबोधित केले.

मंचावर राष्ट्रीय भारतीय काँग्रेसचे नेते माजी सनदी अधिकारी एकनाथ मोरे, माजी उपमहापौर आनंद चव्हाण, डॉ. सचिन सरोदे, डॉ. विठ्ठल भंडारे, ॲड. कॉ. प्रदीप नागापूरकर, प्रा. अनंत राऊत आदी उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा. इरवन्त सूर्यकार, प्रा. देविदास इंगळे, दत्ता तुमवाड, प्रा. ग. ना. गोइनवाड, प्रज्ञाधर कांबळे, कॉ. लता गायकवाड, सपना टोमके, डी. एन. मोरे, बालाजी पाटोळे, कॉ. गंगाधर गायकवाड, प्रा. नरेश भिसे, बालाजी गायकवाड, ॲड. सत्यकुमार जाधव, संकेत पाटील आदींनी प्रयत्न केले.

## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस जाहीररित्या कळविण्यात येते की, अर्जदार श्री मारोती लच्छमन्ना कलेटवाड रा. देगलूर, ता. देगलूर जि. नांदेड यांनी मौ. देगलूर ता. देगलूर, जि.नांदेड सर्वे नं. २४७/१ गट क्र. ८०१ क्षेत्र ०१ हे.१२ आर जमीन हैद्राबाद इनाम निर्मूलन व रोख अनुदान कायदा १९५४ चे कलम ६(३) नुसार कृषीक प्रयोजनासाठी भोगवटादार वर्ग २ मधून वर्ग १ मध्ये रुपांतर करणे बाबतचा विनंती अर्ज केलेला आहे.

तेव्हा मौ. देगलूर, ता. देगलूर जि.नांदेड सर्वे नं. २४७/१ गट क्र.८०१ क्षेत्र ०१ है.१२ आर ही जमीन हैद्राबाद इनाम निर्मूलन व रोख अनुदान कायदा १९५४ चे कलम ६(३) नुसार कृषीक प्रयोजनासाठी भोगवटादार वर्ग २ मधून वर्ग १ मध्ये रुपांतर करणे बाबत कोणाचा काही आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत लेखी स्वरुपात या कार्यालयात कागदोपत्री पुराव्यासह आक्षेप अर्ज सादर करावा. विहित मुदतीत कुणाचा आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी प्राप्त न झाल्यास सदरच्या रूपांतरण प्रकियेस कुणाचाही आक्षेप नाही, असे समजण्यात येवून सदर प्रकरणात नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी. तसेच सदर प्रकरणात विहित मुदतीनंतर आलेले आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**उपजिल्हाधिकारी (सामान्य)**
**जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड**



## Change In Name

My old name is **SEEMATAI KACHARU HANMANTE** which now I am changing as New Name **SEEMA LAXMAN DONGRE** Hence forth my all correspondence will be done as per my Name please consider the same

Address : **SEEMA LAXMAN DONGRE**
Near Mahalaxmi Temple At. Palaj, Tq.
Bhokar, Dist. Nanded Mo. 9011813408

## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८

**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१

तसेच दवाखान्यात बीएएमएस महिला डॉक्टरची नेमणूक करणे आहे.

# गोदातीर समाचार

**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकूण, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308




















































**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४

ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com